दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२७४ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, बुधवार, २० मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

एन्काउंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मा यांना जन्मठेपेची शिक्षा

■मुंबई, विशाल कारंडे : एन्काऊंटर स्पेशालिस्ट अशी ओळख असलेले प्रदीप शर्मा यांना मुंबई उच्च न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. लखन भय्या फेक एन्काऊंटर प्रकरणात प्रदीप शर्मांना दोषी ठरवण्यात आलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात प्रदीप शर्मांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायमूर्ती गौरी गोडसे आणि रेवती डेरे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. २००६ मध्ये झालेल्या लखन भय्या एन्काउंटर प्रकरणाची चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर ती चकमक बनावट असल्याचं एसआयटी चौकशीत उघड झालं होतं. याप्रकरणी मुंबई पोलीस दलांतील १३ अधिकारी आणि पोलिसांना अटक करण्यात आली होती. त्यात प्रदीप शर्मांचाही समावेश होता. त्यानंतर २००८ मध्ये त्यांना निलंबितही करण्यात आलं होतं. मात्र न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली होती. प्रदीप शर्मा हे १९८३ च्या बॅचचे अधिकारी असून २०२० मध्ये ते निवृत्त होणार होते. परंतु त्याआधीच त्यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारून राजकारणात पाऊल ठेवले होते. मात्र राजकारणात त्यांना अपयश आलं. आता त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

या प्रकरणातला निकाल राखून ठेवण्यात आला होता

या प्रकरणात एकूण १६ याचिका आल्या होत्या. या प्रकरणी ८ नोव्हेंबर २०२३ रोजी निकाल राखून ठेवला होता. आज हा निकाल देण्यात आला. या निकालात २००६ मध्ये झालेल्या लखन भैय्या बनावट एन्काऊंटर प्रकरणात प्रदीप शर्मांना दोषी ठरवण्यात आलं होतं. या प्रकरणात आता त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

लखनभय्या एन्काऊंटर प्रकरण काय?

राम नारायण गुप्ता उर्फ लखन भय्या हा गँगस्टर अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनचा जवळचा हस्तक होता. मुंबईत तो छोटा राजनसाठी काम करत होता. प्रदीप शर्मा आणि त्यांच्या पथकाकडून लखन भय्याला वाशी या ठिकाणाहून उचलण्यात आलं. त्यावेळी त्याच्याबरोबर अनिल भेडा हा व्यक्ती होता. याच दिवशी संध्याकाळी मुंबईतल्या वसोर्वा या ठिकाणी असलेल्या नाना-नानी पार्कमध्ये लखन भय्याचं एन्काऊंटर करण्यात आलं. २००६ मध्ये ही घटना घडली होती. आता या प्रकरणात प्रदीप शर्मांना जन्मठेप सुनावण्यात आली आहे.

डोंबिवलीत गावठी दारूचा साठा जप्त; दीड लाख किंमतीची दारू केली नष्ट

■डोंबिवली, दिगंबर जाधव : डोंबिवली जवळील कोळे गाव हद्दीत मानपाडा पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने रविवारी संध्याकाळी छापा मारून दीड लाखाहून अधिक किमतीचा गावठी दारूचा साठा जप्त केला. हा साठा जागीच नष्ट करण्यात आला. लोकसभा निवडणूक जाहीर झाली आहे. या कालावधीत झोपडपट्टी भागात दारू मोफत वाटून मतदारांना आपल्याकडे ओढण्याचे प्रकार काही राजकीय मंडळी करतात. निवडणुकीच्या काळात दारूची अधिक प्रमाणात चढ्या दराने विक्री होते. याची जाणीव असल्याने दारू उत्पादक गाव परिसरातील जंगलात, अडगळीच्या जागेत रात्रीच्या वेळेत गावठी दारू तयार करण्यासाठी भट्ट्या लावतात. डोंबिवली, कल्याण जवळील उंबार्ली टेकडी, हेदुटणे, कोळे, मलंग गड डोंगर परिसर, देसई खाडी किनारा भागात गावठी दारू तयार करण्याचे प्रमाण अधिक असते. कोळे गावात समाधान हॉटेल मागील झाडीमध्ये नीलेश पाटील (२६) याने गावठी दारूचा दीड लाखाहून अधिक किमतीची तयार करून ठेवली आहे. अशी माहिती मानपाडा पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाला मिळाली होती. पोलिसांनी या माहितीची खात्री केल्यानंतर रविवारी संध्याकाळी या भट्टीवर छापा टाकला. तेथील दीड लाखाहून अधिक किमतीची पिंपात साठवून ठेवलेली दारू टिकाव, फावड्यांचे घाव पिंपावर घालून नष्ट केली. घटनास्थळी दारूचा गूळ, नवसागर, पाणी खेचण्यासाठी मशिन आढळून आली. दारू तयार करण्यासाठी दलदलीतील पाणी वापरले जात होते. असेही पथकाच्या निदर्शनास आले. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाने पोलिसांनी नीलेश पाटील याच्या विरुध्द मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. साहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे, मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कदबाने, पोलीस निरीक्षक राम चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड, साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे, हवालदार अनिल घुगे, गणेश भोईर, प्रवीण किनरे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पोलिसांच्या निदर्शनास येऊ नये म्हणून तयार गावठी दारू रात्रीच्या वेळेत महागड्या गाड्यांमधून शहरी भागात विक्रीसाठी आणली जाते. यापूर्वी उत्पादन शुल्क विभाग, मानपाडा पोलिसांनी अशाचप्रकारचे साठे जप्त केले होते. डोंबिवली, कल्याण परिसरातील डोंगर, टेकड्यांवर गर्द झाडीत रात्रीच्या वेळेत दारू भट्ट्या लावण्यासाठी दारू उत्पादकांची मोठी धावपळ सुरू असल्याचे समजते.

मेट्रो मार्गाच्या पुलावरील अनधिकृत भित्तीपत्रके, संदेशवहन तारा काढून टाका अन्यथा कारवाई - सिडको

■पनवेल, नितीन देवळेकर :

सिडको महामंडळाने मेट्रो मार्ग क्रमांक १ बेलापूर ते पेणधर या दरम्याच्या उन्नत पुलावर आणि मेट्रो स्थानकांवर खासगी व्यक्तींनी, संस्थांकडून मेट्रो प्राधिकरणाची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे भित्तीपत्रके (पोस्टर) लावले आहेत. तसेच संदेशवहनाच्या तारा (कम्युनिकेशन वाहिनी) ओढल्या आहेत. त्यामुळे सिडको मंडळाने जाहीर सूचनेद्वारे या तारा व भित्तीपत्रके न काढल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. मागील वर्षी १७ नोव्हेंबरपासून सिडकोने मेट्रो मार्ग क्र. १ वर प्रवासी वाहतूक सुरू केली. मात्र काही खासगी संस्थांकडून मेट्रो मार्गावरील पुलाचे विद्रूपीकरण केले जात आहे. यामुळे मेट्रो गाड्यांच्या परिचालनास व मेट्रो रेल्वेच्या बांधकामांस धोका निर्माण होत असल्याचे सिडको अधिका-यांच्या ध्यानात आल्यावर परवानगीशिवाय कोणतेही अनधिकृत फलकबाजी व तारा ओढल्यास मेट्रो रेल्वे (परिचालन व देखभाल अधिनियम, २००२), उपवाक्य क्र. ६२ (२) व ७८ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सिडकोच्या जनसंपर्क विभागाने दिली.

सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय 'घड्याळ' चिन्ह वापरताना अजित पवार गटाला करावे लागेल अटींचे पालन

■ नवी दिल्ली, प्रगती शर्मा: सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाला मोठा दिलासा दिला आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शरद पवार गट निवडणूक चिन्ह म्हणून 'तुतारी वाजवणारा माणूस' चा वापर करू शकतो. याआधी जेव्हा निवडणूक आयोगाने पवार गटाला हे चिन्ह दिले होते तेव्हा त्याचा वापर राज्यसभा निवडणुकीपूरता वापर करण्याचे आदेश होते. आता मात्र शरद पवार गटाला हे चिन्ह लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत देखील वापरता येणार आहे.सर्वोच्च न्यायालयाने शरद पवार गटाला दिलासा देत असताना निवडणूक आयोगाला देखील स्पष्ट आदेश दिले आहेत. पवार गटाला देण्यात आलेले तुतारी चिन्ह अन्य कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला देण्यात येऊ नये असे निर्देश न्यायालयाने आयोगाला दिले आहेत.याचबरोबर निवडणूक आयोगने अजित पवार गटाला देखील महत्त्वाचे असे आदेश दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे चिन्ह असलेले घड्याळ हे जरी निवडणूक आयोगाने अजित पवार गटाला दिले असले तरी यासंदभार्तील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. त्यामुळेच अजित पवार गटाने यापुढे घड्याळ चिन्ह वापरत असताना प्रत्येक वेळी आणि प्रत्येक ठिकाणी तसा उल्लेख करावा असे सांगितले आहे. याचाच अर्थ यापुढे अजित पवार गट कोणत्याही सभेत, जाहिरातीत, व्हिडिओमध्ये घड्याळ चिन्ह वापरले तेव्हा तेव्हा त्यांना घड्याळ चिन्हाचा वापर करण्या संदभार्तील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे, अशी नोट लिहावी लागणार आहे. ही नोट सर्वांना दिसेल अशा पद्धतीने लिहले पाहिजे असे देखील न्यायालयाने म्हटले आहे.अजित पवार आणि काही आमदार,खासदार बंडखोरीकरत शिंदे आणि फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले होते. त्यानंतर त्यांनी मुळपक्ष आपलाच असल्याचे सांगत त्यांनी पक्ष आणि चिन्हावर दावा केला होता. या प्रकरणी निवडणूक आयोगाने अजित पवारांच्या बाजूने निकाल दिला होता. तर विधानसभेचे अध्यक्षांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांची असल्याचे म्हटले होते. यावर शरद पवार गटाने न्यायालयात धाव घेतली आहे.

ठाणे जिल्ह्यातील लोकसभेकरिता २६ एप्रिल ते ३ मे पर्यंत अर्ज करा दाखल

■ठाणे, रोहीत जैसवाल : जिल्ह्यातील ठाणे, कल्याण आणि भिवंडी या तिन्ही लोकसभा मतदारसंघांत ६५ लाख एक हजार ६७१ मतदारांची नोंद आजपर्यंत झाली आहे. ठाणे जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघाकरिता २० मे रोजी मतदान होणार आहे. पाचव्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीकरिता उमेदवारांना २६ एप्रिल ते ३ मे या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असल्याचे ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी सोमवारी स्पष्ट केले. आचारसंहिता लागू होऊन जेमतेम दोन दिवस झाले असताना जिल्ह्याभरातून तीन तक्रारी दाखल झाल्या. त्यांचे अवघ्या २४ मिनिटात निराकरण केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यात आजपर्यंत ३५ लाख सहा हजार ८२ पुरुष मतदार व २९ लाख ९४ हजार ३१५ महिला मतदारांची नोंदणी झाली आहे. इतर मतदार एक हजार २७४ आहेत. जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघापैकी ओवळा माजीवडा विधानसभेत सर्वाधिक चार लाख ९२ हजार ३८१ मतदार असून, सर्वांत कमी दोन लाख ५२ हजार ४४० मतदार उल्हासनगरमध्ये आहेत. जिल्ह्यात सहा हजार ५२४ मतदान केंद्रांवर मतदान करता येणार आहे. मतदान केंद्रांपैकी २२ केंद्रांवर सर्व महिला अधिकारी, कर्मचारी, पोलिस कामकाज करणार आहेत. १८ मतदान केंद्रे दिव्यांगांसाठी असून, प्रत्येक विधानसभेत एक दिव्यांग मतदान केंद्र आहे. एक मतदान केंद्र युवकांसाठी यंदा प्रथमच असेल. जिल्ह्यातील सहा मतदान केंद्रे संवेदनशील म्हणून जाहीर करण्यात आली असून, यामध्ये भिवंडीतील वारेट, शहापूरमधील दापूर, फुगाळे, भिवंडी पूर्वेतील शांतीनगर येथील दोन मतदान केंद्रे आणि ऐरोलीमधील महापे यांचा समावेश आहे.

मुंबईत काँग्रेसला झटका; माजी खासदार प्रिया दत्त शिवसेना-शिंदे गटाच्या वाटेवर

■मुंबई, यश सावंत : राज्यात लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागल्यापासून काँग्रेस पक्षाला एकापाठोपाठ एक झटके बसताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये मुंबईसह राज्यातील काँग्रेसच्या बड्या नेत्यांनी पक्षाला रामराम ठोकत नवी राजकीय वाटचाल सुरु केली आहे. या पंक्तीत आता मुंबईतील काँग्रेसच्या आणखी एका नेत्याचा समावेश होण्याची शक्यता आहे. आपले वडील सुनील दत्त यांच्याकडून काँग्रेसी राजकारणाचा वारसा मिळालेल्या प्रिया दत्त या लवकरच पक्षाला सोडचिठ्ठी देण्याची शक्यता आहे. काँग्रेसच्या वतुर्ळात सुनील दत्त यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. त्यांच्यानंतर प्रिया दत्त यांनी हा वारसा सक्षमपणे पुढे नेला होता. परंतु, २०१४ मध्ये भाजप सत्तेत आल्यानंतर प्रिया दत्त यांची खासदारकी गेली होती. त्यानंतर पक्षसंघटनेत प्रिया दत्त या बाजूला सारल्या गेल्या होत्या. बराच काळापासून त्या सक्रिय राजकारणापासून दूर होत्या. मात्र, आता लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रिया दत्त एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालील शिवसेनेत प्रवेश करुन राजकारणाच्या दुसऱ्या इनिंगला प्रारंभ करण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी अशोक चव्हाण, बाबा सिद्दीकी, मिलिंद देवरा या बड्या नेत्यांनी काँग्रेस पक्ष सोडला होता. यापैकी मिलिंद देवरा हे शिंदे गटात, बाबा सिद्दीकी हे अजित पवार गटात तर अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश करत थेट राज्यसभेची खासदारकी पदरात पाडून घेतली होती. त्यानंतर आता प्रिया दत्त या शिंदे गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरु झाली आहे. प्रिया दत्त या २००९ साली उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकीटावर निवडून आल्या होत्या. मात्र, त्यानंतर २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत त्यांना भाजपच्या पुनम महाजन यांच्याकडून पराभूत व्हावे लागले होते. एकेकाळी उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघावर प्रिया दत्त यांची घट्ट पकड होती. परंतु, २०१४ मधील भाजपचा शक्तिशाली उदय आणि काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागल्याने सक्षम उमेदवार असूनही प्रिया दत्त यांचा पुनम महाजन यांच्यासमोर टिकाव लागला नव्हता. सूत्रांच्या माहितीनुसार, प्रिया दत्त लवकरच शिंदे गटात प्रवेश करु शकतात. एवढेच नव्हे तर त्यांना शिंदे गटाकडून उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातून उमेदवारी दिली जाऊ शकते. गेल्या पाच वर्षांपासून प्रिया दत्त या मतदारसंघात फारशा सक्रिय नाहीत. त्यांची काँग्रेस पक्षसंघटनेशी आणि कार्यकर्त्यांशी असणारी नाळही तुटली आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील ८५ जणांचे पोलीस संरक्षण काढून घेण्याचे आदेश

■पुणे, अभिजित येरुल्लू : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध राजकीय पक्षांचे नेते, बांधकाम व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्त्यांना देण्यात आलेले पोलीस संरक्षण काढून घेण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले. पुणे शहरातील विविध राजकीय पक्षाचे नेते, बांधकाम व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते, तसेच प्रतिष्ठित नागरिकांना पोलिसांकडून संरक्षण व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येते. त्यासाठी पोलीस आयुक्तालयात अर्ज करावा लागतो. शहरातील ११० जणांना पोलिसांकडून संरक्षण (पोलीस प्रोटेक्शन) पुरविण्यात आले आहेत. पोलीस संरक्षण व्यवस्थेत ३५० जास्त पोलीस कर्मचाऱ्यांचा वापर करण्यात येत आहे.

शहरातील ११० जणांना पोलीस संरक्षण पुरविण्यात आले आहे. त्यापैकी ८५ जणांचे पोलीस संरक्षण काढून घेण्यात आले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस संरक्षण काढून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पोलीस संरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा वापर करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

कचरामुक्तीसाठी विलंबच, मुंबई महापालिकेच्या झोपडपट्ट्यांतील प्रकल्पाला प्रतिसादच मिळेना

■मुंबई, विशाल पाटील : मुंबईतील झोपडपट्टी आणि परिसर कचरामुक्त करण्यासाठी मुंबई महापालिकेने योजना आखली आहे. यामध्ये झोपडपट्ट्यांमधून घरोघरी जाऊन कचरा संकलन करण्याकडे, तसेच गल्लीबोळांमध्ये सफाई करताना सार्वजनिक शौचालयांच्या सफाईकडेही लक्ष देण्यात येणार आहे. या कामासाठी खासगी कंत्राटदाराची नेमणूक करण्याकरीता मुंबई पालिकेने निविदा काढली. मात्र त्याला एकाही निविदाकाराने प्रतिसाद दिलेला नाही. यामुळे निविदेला २६ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मुंबईत यापूर्वी 'स्वच्छता मुंबई प्रबोधन अभियान' नावाची योजना पूर्णपणे अपयशी ठरली. या योजनेचे तीन घटक असून पहिला घटक म्हणजे घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, दुसरा घटक त्या भागातील स्वच्छतागृहांची स्वच्छता आणि देखभाल आणि मलनिःसारण वाहिन्यांची नीट देखभाल करणे हा तिसरा घटक आहे. मात्र या योजनेमध्ये अनेक त्रुटी असल्याने ही योजना अपयशी ठरली. त्यामुळे मुंबई पालिकेने त्याचा नव्याने आराखडा तयार केला आहे. आधीचे अभियान राबवताना सामाजिक संस्था अपयशी ठरल्याने पालिका आता या योनजेसाठी एकाच खासगी कंत्राटदाराची नेमणूक करणार आहे. घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, येथील सार्वजनिक शौचालयांची सफाई करणे, रस्ते, गटारे, नाले, गल्लीबोळे यांच्या सफाईकडेही विशेष लक्ष दिले जाणार आहे. स्वच्छतेशी संबंधित प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी, त्याखाली असलेल्या कनिष्ठ अधिकाऱ्याची जबाबदारी, त्याखाली मुकादम आणि स्वच्छता अधिकारी यांची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.

कल्याणमधील मलंग रोड भागातील व्दारली, दावडी येथील बेकायदा चाळी जमीनदोस्त, आय प्रभागाची कारवाई

■कल्याण, सचिन कदम : कल्याण पूर्वेतील मलंग रस्ता भागातील व्दारली, दावडी गाव हद्दीत मूळ नागरी वस्तीला अडथळा होईल अशा पध्दतीने उभारण्यात आलेल्या १० बेकायदा चाळी आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी अनधिकृत बांधकाम नियंत्रण पथकाच्या साहाय्याने जमीनदोस्त केल्या. दावडी, व्दारली या मलंग रस्त्यावरील भागात भूमाफियांनी १० हून अधिक बेकायदा चाळी उभारल्या होत्या. या चाळींमध्ये गोदामे, इमारत बांधकाम साहित्य विक्रीची दुकाने सुरू करण्यात आली होती. या बेकायदा चाळी रस्ते, गटार, नैसर्गिक स्त्रोतांना अडथळा होत्या. या बेकायदा चाळींच्या अनेक तक्रारी आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्याकडे आल्या होत्या. या चाळींची प्रत्यक्ष पाहणी करून या चाळी बेकायदा असल्याची खात्री झाल्यावर साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली जेसीबी, तोडकाम पथकाच्या साहाय्याने दोन दिवसापूर्वी या भागातील १० चाळी भुईसपाट केल्या. या कारवाईपूर्वी काही राजकीय मंडळी, स्थानिकांनी कारवाईत अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. त्यांना साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी दाद दिली नाही. या कारवाईमुळे भूमाफियांना मोठा दणका बसला आहे. बेकायदा चाळीत नुकसान झालेले व्यावसायिक कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात खोट्या तक्रारी करून अधिकाऱ्यांना त्रास देत असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. आय प्रभागात बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्याची मोहीम सुरू असल्याने भूमाफियांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. अनेक भूमाफियांनी मुंबरकर यांच्या आक्रमक कारवाईमुळे त्यांना अडचणीत आणण्यासाठी त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रारी केल्या असल्याचे समजते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत 'महानाट्य' प्रेक्षकांसाठी विनामूल्य

■ठाणे,प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली व अलौकिक वारशाची महती, त्यांचे कार्य, नीती, चरित्र, विचार व कार्यकुशलतेची जनसामान्यांना, विशेष करून विद्यार्थ्यांना, तरुण पिढीला मार्गदर्शक ठरावी, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन शासन,सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे. या उपक्रमाचा महत्वपूर्ण भाग म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत 'महानाट्य' या कार्यक्रमाचे सलग ३ दिवस विनामूल्य सादरीकरण होणार आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये दि. २२ मार्च ते दि. २४ मार्च २०२४ या तीन दिवसाच्या कालावधीत रोज सायंकाळी ६.३० ते ९.३० या वेळेत हायलॅन्ड मैदान, ढोकाळी, माजिवाडा ठाणे (पश्चिम) या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या महानाट्याच्या विनामूल्य प्रवेशिका डॉ.काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, गडकरी रंगायतन नाट्यगृह व ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग समितींच्या कार्यालयात विनामूल्य उपलब्ध होणार आहेत. यासाठी 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' असणार आहे. आतापर्यंत हा प्रयोग राज्यात २० जिल्ह्यांमधील हजारो नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी या महानाट्याचा आनंद अनुभवला आहे.

सायबर गुन्हे हेल्पलाइनद्वारे ५० कोटी वाचवण्यात यश

■मुंबई, प्रतिनिधी : सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी मुंबई पोलिसांनी सुरू केलेल्या सायबर मदतवाहिनीच्या (हेल्पलाइन) माध्यमातून आतापर्यंत फसवणूकीतील ५० कोटी रुपये वाचवण्यात यश आले आहे. सायबर पोलिसांच्या १९३० या मदत वाहिनीवर आतापर्यंत सुमारे सव्वा दोन लाख दूरध्वनी आले आहेत. त्यानंतर फसवणुकीची रक्कम गोठवण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. मुंबई शहरातील नागरिकांची सायबर गुन्हयामध्ये फसवणूक झालेली रक्कम संबधित बँक खात्यामध्ये गोठविण्याकरिता मुंबई गुन्हे शाखा अंतर्गत १९३० हेल्पलाइन १७ मे २०२२ मध्ये कार्यान्वित करण्यात आली होती. याद्वारे सायबर गुन्हयात हस्तांतरीत झालेली रक्कम तात्काळ गोठवण्याचे काम करण्यात येते. त्या अंतर्गत आतापर्यंत सुमारे ५० कोटी रुपयांची रक्कम गोठविण्यात आली आहे. त्यात ईमेल फिशिंग, ऑनलाइन जॉब फ्रॉड, क्लासिफाईड फ्रॉड, केवायसी अपडेटच्या नावाखाली फसवणूक, वधू-वर सूचन संकेतस्थळावरून ओळख करून फसवणूक, समाज माध्यांवरून ओळख करून फसवणूक, ओटीपी फसवणूक, सेक्सटॉर्शनसारख्या कुठल्याही फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये फसवणूक करण्यात आलेली ही रक्कम आहे. रस्ते अपघातातील जखमीला तात्काळ उपचार मिळून जीव वाचला तर त्या काळाला गोल्डन अवर्स म्हणतात. तसेच सायबर गुन्ह्यांमध्ये लवकर सायबर पोलिसांशी संपर्क साधल्यानंतर पैसे वाचवणे शक्य होते, असे अधिकाऱ्याने सांगितले.

//सुविचार

काय चुकलं हे शोधाणारे आयुष्यात पुढे जातात,
कुणाचं चुकलं हे शोधणारे तिथेच राहतात.

एका मिनिटात दूर होईल डोकेदुखी

अनेकदा लहानसहान कारणांमुळे आपले डोके दुखायला लागते. डोकेदुखीपासून सुटका मिळवण्यासाठी आपण पेनकिलर अथवा काही औषधे घेतो. मात्र त्याचा फायदा तर होत नाहीच, उलट शरीरावर परिणाम होतो. मात्र आता डोकेदुखीवर औषधे घेण्याची गरज नाही. खालील घरगुती उपचारांनी डोकेदुखी पळवू शकता.

- शुद्ध तूप आणि कापूर एकत्र मिसळून डोक्यावर लावल्यास डोकेदुखीपासून त्वरित आराम मिळतो.
- घरगुती तुपामुळे पित्त आणि गॅसची समस्याही दूर होते.
- कापूर रक्त संचालन कार्यान्वित करते. कापूर खंड असल्याने याचा लेप लावल्याने घाम निघून जातो आणि डोकेदुखी बरी होते.

अभिनेत्री विद्या बालनचे उत्कृष्ट अभिनय कौशल्य आपल्या सर्वांनाच परिचयाचे आहे. अभिनयाबाबतीत विद्या जितकी चोखंदळ आहे, तितकीच चोखंदळ ती तिच्या त्वचेबाबतही आहे. तिच्या नितळ, सुंदर त्वचेचे रहस्य, उत्तमपणे केला गेलेला मेकअप नसून, त्वचेची निगा राखण्याकरिता नैसर्गिक वस्तूंचा वापर हे आहे. विद्याप्रमाणे हे नैसर्गिक उपाय आपणही अवलंबले, तर आपली त्वचाही सुंदर, नितळ दिसू शकते.



आपली त्वचा अशी करा 'डी-टॉक्स'

आपल्या आहारामध्ये प्रोसेस्ड अन्नपदार्थ, चरबीयुक्त पदार्थांचा समावेश जास्त असल्यास यातील घातक घटक शरीरामध्ये साठत जातात. शरीरामध्ये साठलेली ही घातक तत्त्वे बाहेर टाकली जाण्यासाठी डी-टॉक्स डाएटचा सल्ला आहार तज्ज्ञ देतात. या डाएटमध्ये प्रोसेस्ड अन्नपदार्थ संपूर्णपणे वर्ज्य करून केवळ नैसर्गिक पदार्थांचे सेवन करावे लागते, जेणेकरून शरीरातील घातक पदार्थ बाहेर टाकले जातील. भरपूर पाणी पिणे, चहा-कॉफीचे सेवन वर्ज्य करणे, ताज्या भाज्यांचे, फळांचे, त्याच्या ताज्या रसांचे सेवन करणे हा या डाएटचाच भाग आहे. ज्याप्रमाणे शरीराला डी-टॉक्स करण्याची आवश्यकता असते, तशीच गरज त्वचेच्या बाबतीतही उद्भवते.

प्रदूषण, सतत वापरला जाणारा मेकअप, तणाव, अपुरी झोप, असंतुलित आहार यांचा परिणाम त्वचेवरही होत असतो. परिणामी त्वचेचा पोत बिघडतो, त्वचेवर मुरुमे येऊ लागतात, त्वचा कोरडी, तेजहीन दिसू लागते. त्वचा सुंदर राहावी याकरिता महिन्यातून किमान एकदा त्वचा डी-टॉक्स करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्वचेतील 'पीएच लेव्हल'ही संतुलित राहते. त्वचा डी-टॉक्स करण्यासाठी रात्री झोपण्यापूर्वी सर्व मेकअप काढून टाकून चेहरा स्वच्छ धुवावा. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यानंतर चेहरा स्वच्छ धुताना, जर त्वचा कोरडी असेल, तर ऑइल क्लिंजरचा किंवा फोम वॉशचा वापर करावा. जर त्वचा तेलकट असेल, तर वॉटर बेस्ड जेलचा उपयोग करावा. त्यानंतर एका मोठ्या भांड्यामध्ये किंवा स्टीमरमध्ये गरम पाणी करून त्याची वाफ चेहऱ्यावर घ्यावी. त्याने त्वचेची रंध्रे खुली होतील. त्यानंतर मुलायम कपड्याने चेहरा पुसून कोरडा करावा.

चेहरा पाण्याने स्वच्छ धुतल्यानंतर फेस मास्क लावावा. बाजारामध्ये प्रत्येक स्कीन टोनकरिता तयार फेस मास्क उपलब्ध असले, तरी घरी तयार केलेला फेस मास्क जास्त उपयुक्त ठरतो. मुलतानी माती वापरून तयार केलेला फेस मास्क तेलकट त्वचेसाठी, तर दही आणि मधाचा वापर करून बनवलेला फेस मास्क कोरड्या त्वचेसाठी वापरावा. हा मास्क काही वेळ चेहऱ्यावर लावून ठेवून नंतर चेहरा पाण्याने धुवावा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी त्वचेवर सिरम सोबत फेशियल ऑइलही लावावे.

त्वचा डी-टॉक्स करणे, हे योग्य

रात्री योगा करणे योग्य आहे का?

तुम्ही सकाळी लवकर उठू शकत नाही आणि दुपारी तुम्हाला योगा करण्यासाठी वेळ मिळत नाही, पण याचा अर्थ असा नाही की तुम्ही तुमच्या जीवनातून योगाला पूर्णपणे बहिष्कृत करायला पाहिजे. चांगली गोष्ट अशी आहे की योगाला तुम्ही आपल्या कार्यक्रमात कधीही फिट करू शकता. रात्री योगा करण्यास काहीच हरकत नसते. जर तुम्ही एखाद्या कॉर्पोरेट कंपनीत काम करत असाल, तर तुम्ही रात्री योगा करू शकता, कारण तुमच्याजवळ हाच एक विकल्प असतो. पण रात्री योगा करण्याअगोदर काही गोष्टी लक्षात ठेवण्यासारख्या आहे त्या जाणून घ्या...

जेवणानंतर तुम्ही कमीत कमी २-३ तास योगासनाचा अभ्यास करू नये. तुम्ही तुमच्या कामानंतर थोडी फळे खाऊ शकता आणि जर तुम्ही रात्री नऊ वाजता अभ्यास करणार असाल तर तुम्हाला ६.३० वाजता जेवण घ्यायला पाहिजे. रात्री अशी काही योगासने करायला पाहिजे ज्याने तुम्हाला ऊर्जा आणि शांती मिळते. काही योगासने शांत आणि सशक्त असतात आणि संध्याकाळी व रात्रीच्या वेळेस त्याचा अभ्यास चांगल्या प्रकारे होऊ शकतो.

तुम्हाला असाही प्रयत्न करायला पाहिजे की तुमचा योगाभ्यास योग निद्रासोबत संपायला पाहिजे. योग निद्रा तुमच्या अभ्यास आणि तुमच्या दिवसात एक शांतीपूर्वक माध्यम बनायला पाहिजे.

जर तुमचे पीरियड्स सुरू असतील तर आधीच्या २ दिवसांमध्ये रात्री योगा करू नये. त्याशिवाय जर तुम्ही गर्भवती असाल तर रात्री योगा करणे योग्य ठरत नाही.

शरीराची एनर्जी टिकवायची असल्यास...

दिवसभराची धावपळ, प्रवास, ऑफिसमधले काम आणि घरच्या जबाबदाऱ्या यामुळे आपण अक्षरशः थकून जातो. दिवस संपत जातो तसे अंगातील त्राण संपल्यासारखे वाटायला लागते. मानसिक आणि शारीरिक कष्ट झाल्याने आपण अगदीच थकून जातो. मात्र ही खाली जाणारी एनर्जी टिकवायची असल्यास काही गोष्टींची आवर्जून काळजी घ्यायला हवी. काय करता येईल ही एनर्जी टिकवायची असल्यास, पाहूयात काही खास उपाय...

आरोग्याच्या तक्रारींना बाय बाय करा : थायरॉईड, मधुमेह, हृदयरोग आणि अर्थ्रायटीस आणि स्लिप ॲप्निया या समस्या सामान्यपणे दिसून येतात. या लोकांना ठरावीक काळाने थकवा आल्यासारखे वाटते. त्यामुळे ज्यांना या समस्या जाणवतात त्यांनी विशेष काळजी घ्यायला हवी. दिवसातील ताण कमी करण्यासाठी नियमित आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. याबरोबरच वरील आजार असणाऱ्यांनी योग्य ते उपचार घेण्याचीही आवश्यकता आहे.

ध्यान आणि योग : ध्यान, प्राणायाम आणि योगामुळे जीवनमान सुधारण्यास मदत होते. ताणापासून मुक्तता मिळवायची असल्यास काही ठरावीक योगासने उपयोगाची ठरतात. त्यामुळे तुमची दिवसभराची एनर्जी टिकून राहण्यास मदत होते.

व्यायाम गरजेचा : शरीरातील एनर्जी वाढवण्यासाठी दररोज ठरावीक व्यायाम करणे गरजेचे आहे. ब्रिस्क वॉकिंग, जॉगिंग आणि ठरावीक व्यायाम दिवसभराची एनर्जी टिकवून ठेवण्यासाठी गरजेचे असते. व्यायामामुळे आरोग्य जीवन तर सुधारते, त्यामुळे दररोज किमान २० ते ३० मिनिटे व्यायाम आवश्यक आहे.

भरपूर पाणी पिणे : शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्यास एनर्जी कमी झाल्यासारखे वाटते. याशिवाय शरीराच्या हालचाली मंदावतात आणि मळमळ होत असल्यासारखे वाटते. त्यामुळे दिवसातून किमान ३ ते ४ लिटर पाणी शरीरात जाणे अत्यावश्यक आहे. शरीरात योग्य प्रमाणात पाणी असल्यास आपण ताजेतवाने राहतो आणि एनजीर्ही टिकून राहते.

शरीरावरील जास्तीची चरबी कमी करा : तुम्हाला स्वतःला एनर्जेटिक ठेवायचे असल्यास शरीरावरील अनावश्यक वाढलेली चरबी कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे योग्य व्यायाम आणि आहार तसेच संतुलित जीवनशैली यांच्या मदतीने चरबी कमी केल्यास एनर्जी टिकून राहण्यास मदत होते. लठ्ठ लोकांना लवकर हालचाली करता न आल्याने त्यांची एनर्जी लवकर डाऊन होते.

शांत झोप : एनर्जी चांगल्या पद्धतीने टिकून ठेवायची असल्यास शांत झोप मिळणे आवश्यक आहे. रोज रात्री किमान ७ ते ८ तास झोप मिळणे आवश्यक असते. शांत झोप झाल्याने मानसिक आणि शारीरिक ताण कमी होण्यास मदत होते.

नवीन पदार्थ चाखण्याची इच्छा नाही... 'या' आजाराचे संकेत

नवनवीन पदार्थांचा अस्वाद घेण्याची इच्छा प्रत्येकाला असते. परंतु काही मंडळी या गोष्टीसाठी अपवाद असतात. काहींना नवीन पदार्थांची चव चाखायला देखील आवडत नाही. अशा व्यक्तींना 'फूड नीओफोबिया'ची समस्या असल्याचे एका अहवालातून स्पष्ट झाले आहे. ही समस्या मुख्यतः हृदयविकार त्याचप्रमाणे मधुमेह २ असलेल्या व्यक्तींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येते. या आजारामध्ये रुग्ण नवीन पदार्थांची चव घेण्यास नकार देतो. फिनलंडमधील 'हेलसिंकी विद्यापीठ' आणि एस्टोनेशियामधील 'युनिव्हर्सिटी ऑफ टार्टू'च्या संशोधकांनी आहाराची गुणवत्ता, जीवनशैलीसह संबंधित आजार आणि जोखिमांवर संशोधन केले. आहारातील सवयी, जीवनशैलीशी संबंधित रोगांचा प्रभाव आणि आहाराच्या वर्तनासंबंधी त्यांच्या जोखीम घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. तब्बल सात वर्षे सुरू असलेल्या या संशोधनात २५ ते ७४ वयोगटातील व्यक्तींचा समावेश करण्यात आला होता. 'फूड नीओफोबिया' हा आजार ७८ टक्के आनुवंशिक असल्याचे अहवालात सादर करण्यात आले आहे. हा आजार लहान मुलांमध्ये आणि वृद्धांमध्ये आढळून येतो.

'मराठी सिनेमा ठराविक लोकांच्या हातात', पुरुषोत्तम बेर्डेनी मांडलं स्पष्ट मत; 'त्या' दोन निर्मात्यांचा उल्लेख करत म्हणाले..

मराठी कलाविश्वातील ज्येष्ठ व यशस्वी दिग्दर्शक म्हणून पुरुषोत्तम बेर्डे यांना ओळखलं जातं. ९० च्या दशकांत त्यांनी अनेक लोकप्रिय चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. १९८३ मध्ये त्यांच्या नाट्यसंस्थेने रंगभूमीवर टूरटूर हे नाटक आणलं. याच नाटकामुळे लक्ष्मीकांत बेर्डेंना देखील घराघरांत एक वेगळी ओळख मिळाली होती. सुरुवातीला या नाटकाला प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. परंतु, कालांतराने हे नाटक रंगभूमीवर प्रचंड गाजलं. अशा या लोकप्रिय दिग्दर्शकाने नुकतीच सिनेमागल्ली या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. यावेळी मराठी कलाविश्वात झालेले बदल, आर्थिक गणितं यावर त्यांनी भाष्य केलं. मराठी सिनेमाविश्वातील तेव्हाचं (जुन्या काळातील) अर्थकारण आणि आजचं अर्थकारण या प्रश्नाचं उत्तर देताना पुरुषोत्तम बेर्डे सांगतात, एखादा सिनेमा त्याकाळी चालला, तर फायदेशीर ठरायचं आणि नाही चालला तर माणसाला पाणीही पिता येणार नाही एवढा मोठा तोटा व्हायचा. आजही सर्वत्र तशीच परिस्थिती आहे. या सगळ्यात निर्मात्यांना किती पैसे मिळतात हा आजही प्रश्नच आहे. निमार्ता फक्त सिनेमा बनवतो त्यानंतर मग पुढे, फायनान्सर वगैरे असे अनेक टप्पे असतात. हिंदीमध्ये जरुर पैसा मिळत असेल कारण, तिथे अनेक नियम व अटी असतात.



पण, मराठी सिनेमांच्या बाबतीत असं होत नाही.मराठी सिनेमा पुन्हा एकदा ठराविक लोकांच्या हातात गेला आहे. नानूभाई, संजय छाब्रिया, चॅनेल्सच्या हातात सगळं अर्थकारण आहे. यापैकी नानूभाई जयसिंघानी हे निमार्ते आहेत त्यांना निशाणी डावा अंगठा हा चित्रपट दाखवल्यानंतर ते काहीच न बोलता माज्या तोंडासमोरून निघून गेले. त्यांनी मला चित्रपट कसा झालाय हे सुद्धा सांगितलं नव्हतं. त्यांच्या दृष्टीने तो चित्रपट अतिशय फालतू होता असे भाव मला त्यांच्या चेहऱ्यावर दिसले. अशा लोकांच्या हातात इंडस्ट्री असल्यावर तुम्हाला काय मिळणार? असा सवाल पुरुषोत्तम बेर्डेनी उपस्थित केला आहे. पुरुषोत्तम बेर्डे पुढे म्हणाले, आजची इंडस्ट्री ही अशाप्रकारे कोणाच्या तरी हातामध्ये आहे. पूर्वी वितरक वेगळे होते.

'वजन वाढतं, खूप इंजेक्शन्स...', प्रसिद्ध अभिनेत्रीने केले Eggs Freeze, मातृत्वाबद्दल म्हणाली

हिंदी टेलिव्हिजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून रिद्धिमा पंडितला ओळखलं जातं. आजवर तिने अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये काम केलं आहे. ह्यबिग बॉस ओटीटीह्ल, ह्यबहु हमारी रजनीकांतह्ल या कार्यक्रमांमुळे ती घराघरांत लोकप्रिय झाली. ऐन तिशीत अभिनेत्रीने तिच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेतला होता. रिद्धिमाने नुकत्याच डिजिटल कॉमेंट्रीला दिलेल्या मुलाखतीत आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेक खुलासे केले आहेत. यावेळी तिने बीजांडे गोठवण्याचा कठीण प्रसंग सांगितला. मत मांडताना रिद्धिमा म्हणाली, गोष्ट आहे. अनेकांची यावर आयुष्यात याचं कोणत्याही होत गैरसमज जाणवतो. नाही माहिती गोष्टी तुम्हाला मातृत्व व एग्ज फ्रीज याबद्दल आपलं माज्यासाठी मातृत्व ही खूप मोठी विविध मतं असू शकतात. पण, माज्या महत्त्व खूप आहे. वयाच्या तिशीत मला प्रकारची रिस्क घ्यायची नव्हती. प्रत्येक महिलेच्या आयुष्यात जैविक जडणघडण (बायोलॉजिकल क्लॉक) असते. दैनंदिन बदलामुळे एका ठराविक काळानंतर प्रत्येक स्त्रीच्या शरीरातील एग्ज कमी होत जातात याची मला जाणीव होती. याशिवाय या सगळ्या गोष्टींचं ज्ञान देखील मला होतं. रिद्धिमा पुढे म्हणाली, या सगळ्या गोष्टी माज्यासाठी अजिबात सोप्या नव्हत्या. एग्ज फ्रीज करण्यासाठी खूप इंजेक्शन्स घ्यावी लागतात. शरीर फुगलेलं असतं. वजन खूप जास्त वाढतं, त्रास होतो. परंतु, हे चिंताजनक नाही हळुहळू सगळ्या गोष्टी कमी होतात. हार्मोनल इंजेक्शनमुळे तुम्ही खूप जाड होता हा फक्त आहे. खूप बदल होतो असं होत नाही पण, थोडा बदल लग्नाविषयी विचारलं असता रिद्धिमा म्हणाली, मला माज्या आयुष्यात लग्न करणं आहे की नाही. सगळ्या जोडीदार कसा मिळतो यावर अवलंबून असतात.

दैनिक लोकरक्षणाय सुडोकू - ३६

3	5	1		7				9
	9	7	4	8				
		8		5	1		3	
	1		7	2			4	3
9							5	8
	7	3			4		2	
4			2					
					7			4
		5	3		9		6	1

उत्तर सुडोकू -३५

4	8	2	5	9	3	1	6	7
3	5	1	4	6	7	2	8	9
7	6	9	8	1	2	3	4	5
8	3	6	7	5	1	4	9	2
9	7	4	3	2	6	5	1	8
1	2	5	9	8	4	6	7	3
6	9	8	1	3	5	7	2	4
2	4	3	6	7	9	8	5	1
5	1	7	2	4	8	9	3	6

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

दिनविशेष

२० मार्च

- १६०२: डच इस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.
- १८५४: रिपब्लिकन पार्टी ऑफ अमेरिका या पक्षाची स्थापना झाली.
- १७३९: नादीरशहा यांनी दिल्लीतील मयुरासन आणि नवरत्ने लुटून इराणला पाठवली.
- १९१६: अल्बर्ट आईनस्टाईन यांनी सापेक्षवादाचा सिद्धांत मांडला.
- १९१७: महाडचा चवदार तळे सत्याग्रह सुरु झाला.
- १९५६: ट्युनिशियाला फ्रान्सकडून स्वातंत्र्य मिळाले.
- २०१५: सूर्यग्रहण, रात्र व दिवस सारखा असण्याचा काळ, आणि चंद्र पृथ्वीच्या सगळ्यात जवळ येणे हे सर्व एकाच दिवशी झाले.
- १८२८: नॉर्वेजीयन नाटककार आणि कवी हेनरिक इब्सेन यांचा जन्म. (मृत्यू: २३ मे १९०६)
- १९०८: ब्रिटिश अभिनेता सर मायकेल रेडग्रेव्ह यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च १९८५)
- १९२०: नाटककार वसंत कानेटकर यांचा जन्म. (मृत्यू: ३१ जानेवारी २०००)
- १९६६: पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांचा जन्म.
- १७२६: इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ,गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ सर आयझॅक न्युटन यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १६४२)
- १९२५: ब्रिटीश मुत्सदी आणि भारताचे व्हॉइसराय लॉर्ड कर्झन यांचे निधन. (जन्म: ११ जानेवारी १८५९)
- १९५६: मराठी नावकाव्याचे प्रणेते बा. सी. मर्ढेकर यांचे निधन. (जन्म: १ डिसेंबर १९०९)
- २०१४: भारतीय पत्रकार आणि लेखक खुशवंत सिंग यांचे निधन. (जन्म: २ फेब्रुवारी १९१५)

भविष्य

मेष हितशत्रूंना आवर बसेल. भरणी नक्षत्राच्या व्यक्तींना राजकीय लाभ घडतील. कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार खरेदीत फसण्याचा.

वृषभ कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना सप्ताहारंभ नोकरीत हितशत्रू पीडेचा. १४ व १५ हे दिवस मृग नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार प्रवास.

मिथुन सप्ताह काहींना विशिष्ट वेदनेतून हैराण करणारा. बाकी सप्ताहाची सुरुवात पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना वैयक्तिक उपक्रमांतून छानच.

कर्क अतिशय संमिश्र ग्रहमान राहील. पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना शुक्राच्या राश्यांतराचा पुष्य नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमान राहतील.

सिंह यंत्रं, वाहनं आणि कामगार या त्रिघटकांतून उपद्रव निर्माण करणारा सप्ताह. मघा नक्षत्राच्या व्यक्तींनी अपवादात्मक उद्भवू पाहणाऱ्या परिस्थितीचं भान ठेवावं. विचित्र अडचणी

कन्या बाकी सप्ताह स्वतंत्र व्यावसायिकांना चांगला प्रतिसाद देईल. हस्त नक्षत्राच्या व्यक्तींचे मोठे व्यावसायिक करारमदार होतील. व्यावसायिक भांडवल पुरवठा होईल. पुत्रचिंता जाईल.

तुला प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपर्कामुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

वृश्चिक फक्त आजची संध्याकाळ आणि शनिवारची संध्याकाळ वातार्लापातून सांभाळावी. प्रेमिकांनी जपून. घरात कोणाचं लग्न ठरवाल. ज्येष्ठा नक्षत्राची व्यक्ती सप्ताहात चैनीवर खर्च करेल.

धनु उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती मॅन ऑफ दि मॅच होतील. मूळ नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमानच राहतील. राजकीय व्यक्तींकडून लाभ. मात्र शनिवारी वेंधळेपणा टाळा.

मकर आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

कुंभ शनिभ्रमणाच्या पार्श्वभूमीवर हेच सांगत आहे. बाकी ता. १४ च्या वसंत पंचमीची संध्याकाळ गाठीभेटींतून हृद्य राहील. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींना धनलाभ. तरुणांचं नैराश्य जाईल.प्रेमप्रकरणातून गती मिळेल.

मीन अर्थातच जीवनात उत्तम सीक्वेन्स लागतील. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात हट्टीपणा टाळावा. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात थट्टामस्करी टाळावी. उत्तरा-भाद्रपदा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात चुकीच्या मित्रांची संगत टाळावी.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

भारतासाठी ऐतिहासिक संधी

सेमीकंडक्टर चीप्सची जागतिक मागणी वर्षागणिक वेगाने वाढत आहे. त्या स्पर्धेत अमेरिका, चीन, कोरिया, तैवान आदी देश आहेत. भारतालाही याबाबतीत मोठी संधी आहे. देशात त्यासाठी पोषक, पूरक वातावरण आहे. त्यामुळेच टेकेड साठी उचललेली पावले महत्त्वाची आहेत.पहिल्या औद्योगिक क्रांतीनंतर संपूर्ण जगाने कित्येक स्थित्यंतरे अनुभवली आहेत. दुसऱ्या महायुद्धापासून औद्योगिक स्पर्धात्मकता खऱ्या अर्थाने वाढीस लागली. साधारणपणे १९७०च्या दशकापासून संगणकयुगाची सुरुवात झाली असली तरी, अगदी रोजच्या वापरात तो येण्यासाठी एकविसावे शतक उजाडावे लागले. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, संगणकाच्या मायक्रोप्रोसेसिंग सेमीकंडक्टर चिप्समध्ये झालेले सकारात्मक बदल.जसे, आकार कमी होणे, प्रोसेसिंगची क्षमता कित्येक पटीने वाढणे, किमती कमी होणे इत्यादी. गेल्या दशकात, या चिप्सवरील सर्किटचे डिझाईन व उत्पादन याबाबत वेगाने प्रगती झाली. त्यामुळे, जगाची डिजिटल वर्ल्ड कडे वेगाने वाटचाल सुरू झाली आहे. मोबाईल फोन आणि संगणकांबरोबरच आज जवळ-जवळ सर्व वस्तू डिजिटल होत आहेत. वाहने, फ्रिज, वॉशिंग मशिन, पार्किंग्स इत्यादी काही प्रातिनिधिक उदाहरणे आहेत; ज्यामध्ये सेमीकंडक्टर चिप्सचा वापर होतो.अमेरिकेतील मॅकेन्झी या संस्थेच्या २०२२च्या अहवालानुसार, चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या युगात प्रोसेसिंग चिप्सचा वापर अनिवार्य आहेच; पण इंटरनेट ऑफ थिंग्स च्या (आयओटी) वापरामुळे चिप्सचा वापर कित्येक पटीने वाढणार आहे. जागतिक बाजारात त्याची उलाढाल २०२१मधील ४८हजार अब्ज रुपयांवरून २०३०पर्यंत ९० हजार अब्ज रुपयांपर्यंत पोचण्याची शक्यता आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते, जसे पूर्वी तेल म्हणजे अर्थव्यवस्थेचा कणा मानले जायचे, तसे आज ही जागा या चिप्स घेत आहेत.सेमीकंडक्टर चिप्स उद्योगाला साधारणपणे तीन भागात विभागात येते. ते म्हणजे डिझाईन, उत्पादन आणि जोडणी. तेल ही नैसर्गिक संपत्ती आहे, जे जगाच्या काही अत्यंत मोजक्याच देशांत उपलब्ध आहे. परंतु, चिप्स बनवण्यासाठीची नैसर्गिक संपत्ती म्हणजे वाळू जगातील सर्व देशांत मुबलक उपलब्ध आहे. वाळूतील सिलिकॉन डायऑक्साईडवर प्रक्रिया करून शुद्ध सिलिकॉनच्या डिस्क किंवा वेफर्स बनवण्यात येतात.त्यावर रासायनिक प्रक्रिया करून, एका केसाच्या जाडीच्या शेकडो पटीने कमी जाड असलेले व गुंतागुंतीची रचनात्मक आखणी केली जाते. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये साधारणतः हे सिलिकॉनचे वेफर्स एक हजार १००अंश तापमानाला २७ वेळा तापवले आणि थंड केले जातात. तसेच इतर सातशेपेक्षा अधिक वेगवेगळ्या प्रक्रिया साधारणतः चार महिन्यांत केल्या जातात.हे वेफर्स नंतर कापून त्यातून चिप्स वेगळ्या करून त्यांच्या ठरलेल्या उपयोगानुसार उपकरणांसाठी जोडण्यात येतात. या प्रक्रियेसाठी प्रचंड प्रमाणात अतिशुद्ध पाणी व हवा लागते. अशा चिप्सच्या डिझाईन उद्योगामध्ये अमेरिका अग्रेसर आहे. तेथील डिझाईन चीन, तैवान, कोरिया इत्यादी देशांत आऊटसोर्स केल्या जातात. हे देश या चिप्सच्या प्रत्यक्ष उत्पादनात अग्रेसर आहेत. जगातील चिप्सचे साधारणपणे ५०% उत्पादन तैवान, ५% चीन, १७% कोरियामध्ये होते. जपानमधून शुद्ध सिलिकॉन निर्यात होते.या सेमीकंडक्टर चिप्सची २०२० ते २०२३ या काळात टंचाई निर्माण झाली होती. अजूनही त्याचे परिणाम जागतिक अर्थकारणावर दिसतात. तैवानमध्ये २०२१मध्ये पडलेल्या दुष्काळामुळे प्रचंड पाणीटंचाई निर्माण झाली होती. त्याचा थेट परिणाम डिजिटल उत्पादन व बाजारावर झाला होता. कोविडच्या काळात घराबाहेर पडणे दुरापास्त झाले. त्यामुळे वाहनांची विक्री घटली.घरातूनच ऑफिसचे काम करणे, शाळा-महाविद्यालयांचे शिक्षण घेणे आवश्यक झाल्यामुळे संगणक व मोबाईल फोन्सची मागणी प्रचंड वाढली. त्यामुळे आधीच पूर्ण क्षमतेने उत्पादन करणाऱ्या सेमीकंडक्टर चिप्स बनवणाऱ्या कंपन्यांवर प्रचंड ताण आला. या चिप्स बनवण्यासाठी काही आठवड्यांचा काळ लागत असल्यामुळे, त्याचा अनुशेष साठत जाऊन जगाच्या अर्थकारणाला फटका बसला. साधारण २०२२-२३मध्ये वाहनउद्योग पूर्ववत होत असताना चिप्सअभावी कित्येक वाहने कंपन्यांमध्ये पडून राहिली. वाहनांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर न भूतो... असा वाढत असताना हा फटका खूप मोठा होता. रशिया-युक्रेन युद्धामुळे सेमीकंडक्टर चिप्स उद्योगात महत्त्वाच्या निऑन गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम झाला होता. चीनमधून त्याची भरपाई करण्यात साधारण वर्षाचा काळ जावा लागला.चीन -अमेरिका संघर्षामुळे चीनमधील कित्येक चिप्स उत्पादक कंपन्यांवर विविध निर्बंध आलेले आहेत. परिणामी नवीन कंपन्या प्रस्थापित होऊन पुढे येणे आवश्यक आहे. त्यातच चीन आणि तैवान यांच्यात राजनैतिक व लष्करी संघर्षाची शक्यता वर्तवली जाते. तसे झाल्यास जगातील सेमीकंडक्टर चिप्सचा पुरवठा ५० टक्क्यांहून अधिक बंद होण्याची शक्यता आहे.या उद्योगात प्रचंड नफा असला तरी खूपच अस्थिरता आहे. त्यामुळे अशा देशाची गरज आहे जो त्याच्या सामरिक स्थैर्यासाठी व संसाधनांच्या उपलब्धतेबाबत स्वयंपूर्ण असेल. राजकीय इच्छाशक्तीही दाखवेल. हे ओळ्खूनच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विकसित भारत चे उद्दिष्ट साकारण्यासाठी १३ मार्च रोजी टेकेड ची घोषणा केली. टेक्नॉलॉजी आणि डीकेड या दोन शब्दांपासून टेकेड चा जन्म झाला आहे.ज्यामध्ये भारताला डिजिटल युगासाठी आत्मनिर्भर बनवणे, रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे, जीवनस्तर उंचावणे; येणाऱ्या काळात जगाला डिजिटल तंत्रज्ञान पुरवणे इत्यादी उद्देश ठेवले आहेत. तीन मोठ्या प्रकल्पांची मुहूर्तमेढ पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आली.त्यामध्ये ८०० अब्ज रुपयांच्या गुंतवणुकीचा गुजरातमधील ढोलेरा येथे चिप्सउत्पादन प्रकल्प, साणंद येथे भारतातील सीजी-पॉवर आणि जपानमधील रेनेसास यांच्या संयुक्त विद्यमाने ८०अब्ज रुपयांची गुंतवणूक असलेला इस्त्रो आणि संरक्षण आदींशी संबंधित चिप्स उत्पादनप्रकल्प, तसेच आसाममधील मोरीगाव येथे २४०अब्ज रुपयांच्या गुंतवणुकीचा चिप्सजोडणी व अंतिम रूप देण्याच्या उद्योगाची मुहूर्तमेढ झाली. हे प्रकल्प कार्यान्वित होण्यास दोन वर्षे लागतील.

आधी कष्ट, मग फळ..

भाजपचे काय बरोबर नाही यावर भर देतानाच आपलेही काय/ कोठे चुकते हे 'इंडिया'च्या नेत्यांनी मान्य करावे व भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांकडून काही शिकावे. 'इंडिया' आघाडीच्या मुंबई मेळाव्याच्या निमित्ताने राजकीय चचेर्चा विषय काय? तर राहुल गांधी हे शिवसेना संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या समाधिस्थळी जाऊन त्यांच्या स्मृतीस अभिवादन करतील का? भूतकाळात ठाकरे हे काँग्रेसचे कडवे टीकाकार होते आणि गांधी कुटुंबीय हे त्यांच्या टीकेचे लक्ष्य असत, ही या चचेर्ची पार्श्वभूमी. याचा अर्थ एके काळच्या टीकाकारास आदरांजली वाहणे हे जणू अब्रह्मण्यम. ही चर्चा 'इंडिया' आघाडीच्या मेळाव्याचे थेट प्रक्षेपण करणाऱ्या दूरचित्रवाणी वाहिन्यांत जशी होती तशी 'इंडिया' आघाडीविरोधात कुजबुज आघाडी उघडणाऱ्या राजकीय विरोधकांकडून समाजमाध्यमांतही घडवली जात होती. हे सध्याच्या राजकारण्यांच्या आणि त्यावरील भाष्यकार माध्यमांच्या उंचीचे निदर्शक.

राजकारण हे प्रवाही असते आणि कोणा एका काळात आणि साच्यात ते कोरले गेलेले नसते. 'ॲन आर्ट ऑफ द इम्पॉसिबल' असे राजकारणाचे वर्णन केले जाते. म्हणजे अशक्य ते शक्य करणारी कला. त्यामुळे एके काळचे प्रतिस्पर्धी, आताचे मित्र इत्यादी चर्चा अस्थानी ठरतात. हे कदाचित तरुण माध्यमकर्मीस माहीत नसू शकते. तथापि 'इंडिया' आघाडीच्या विरोधकांस ते माहीत नाही, असे नाही. तरीही अशा चर्चा घडवून आणल्या जातात. याचे कारण 'इंडिया' आघाडी ही मतलबी, अप्पलपोट्या, विचारभ्रष्ट राजकीय पक्षांचे संमेलन आहे असे दाखवण्याचा प्रयत्न. राजकारण म्हणून तो स्तुत्य. पण या असल्या मुद्द्यांवर राजकारण करावयाचे तर रा. स्व. संघाचे कडवे विरोधक आणि या संघटनेवर कारवाई करणारे सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्मारक भाजपने उभारण्याच्या मुद्द्याकडे लक्ष वेधावे लागेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'आपलेसे' करण्याचा प्रयत्न कोणकोणत्या राजकीय विरोधकांकडून होतो याचेही स्मरण करावे लागेल. सबब राजकीय पक्ष, त्याची विचारधारा कोणतीही असो. सत्तेच्या समीकरणात प्रत्येक पक्ष लवचीकता दाखवतो. 'इंडिया'च्या राहुल गांधी यांनी ठाकरे स्मारकासमोर नतमस्तक होऊन हीच लवचीकता दाखवली. ती असमर्थनीय ठरवायची असेल तर वर उल्लेखलेल्या आणि अनेक भ्रष्टाचारी नेत्यांस पावन करून घेणाऱ्या लवचीकतेचेही समर्थन करावे लागेल. तेव्हा हे फुसकट मुद्दे सोडून या सभेचा परामर्श घ्यायला हवा.

तसे करताना राजकीय सभांतील गर्दी राजकारणाची दिशादर्शक अजिबात नसते हे सत्य गृहीत धरावे लागेल. गदीर्चे व्यवस्थापन ही कला आहे आणि प्रचंड संख्येने बेरोजगारी असलेल्या आपल्या देशात गर्दी जमवणे तितके अवघड नसते. तेव्हा गदीर्चा आकार हा मुद्दा विचारार्ह नाही. या गदीर्चा प्रतिसाद किती जिवंत होता अथवा नाही, याचा विचार करणे आवश्यक. तसे केल्यास लालूपुत्र तेजस्वी यादव यांचे भाषण उल्लेखनीय ठरते आणि त्याशिवाय शरद पवार, उद्धव ठाकरे तसेच राहुल गांधी यांच्या भाषणांस मिळालेला प्रतिसादही दखलपात्र ठरतो. यादव यांच्या भाषणात लालू यांची झलक होती. लालूंसारखा राजकीय मनोरंजनकार अन्य पक्षांत नाही. लालूपुत्रात वडिलांची जागा घेण्याची क्षमता जरूर दिसते. त्याचा राजकीय परिणाम किती होतो हे आताच्या निवडणुकांत दिसेल. याआधी लालूंच्या पक्षास नितीशकुमार यांची साथ होती. त्यामुळे त्या उभयतांच्या यशात कोणाचा किती वाटा हे ठरवणे अवघड होते. नितीशकुमार यांच्या सरकारात उपमुख्यमंत्रीपदी राहिलेले यादव या निवडणुकांत स्वतंत्र आहेत. त्यांच्या यशापयशावर भाजप-प्रणीत 'रालोआ' ४०० चा टप्पा पार करणार किंवा काय हे अवलंबून असेल. हे यादवांचे नावीन्य वगळता अन्यांच्या भाषणात नवीन फार काही नव्हते.

राहुल गांधी यांनी रडक्या काँग्रेस नेत्याचा केलेला उल्लेख हा एक त्यातल्या त्यात अपवाद. या नेत्याचे नावही राहुल गांधी यांनी सांगितले असते तर बरे झाले असते. कारण असेही भाजपस सत्ता मिळाली तर हा नेता काही पुन्हा विरोधकांच्या 'अशोकवनात' परतण्याची शक्यता नाही. त्यामुळे त्यांचा परिचय करून देणे समयोचित ठरले असते. आणि दुसरे असे की अलीकडे अन्य पक्षांतून भाजपत जाणारा प्रत्येक नेता हा 'ईडी-पीडे'च्या भीतीने जातो, असे मानले जाऊ लागले आहे. 'ईडी-पीडाग्रस्त' नेते हे प्राधान्याने भाजपत जातात हे सत्य असले तरी प्रत्येक भाजप-गमनी नेता हा 'ईडी-पीडाग्रस्त' असतो असे नाही. सत्तालोभाने आणि त्याहीपेक्षा काँग्रेस वा अन्य विरोधी पक्षात राहिल्यास या लोभपूतीर्ची शक्यता नसल्याने भाजपत जाणारेही कमी नाहीत. तेव्हा या अश्रुपतित नेत्याचे नाव राहुल गांधी यांनी उघड केले असते तर निदान केंद्रीय यंत्रणांना दिल्या जाणाऱ्या श्रेयाचा आकार काही प्रमाणात तरी कमी झाला असता. आणि त्यामुळे आपल्या पक्षांस सत्तासंधी का मिळत नाही या प्रश्नास भिडण्याची गरज 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांस वाटली असती. केंद्रीय सत्ताधारी भाजप हा विविध यंत्रणांद्वारे विरोधी पक्षीय नेत्यांवर दबाव आणतो, त्यांस वाकवून पक्षांतरांस बळी पाडतो इत्यादी आरोप त्या पक्षाचे समर्थकही नाकारणार नाहीत. पण तेवढे एकच कारण विरोधी पक्षीयांस जनता नाकारते यामागे नाही. ते तसे आहे असे मानणे पराजित विरोधकांसाठी सुखकारक असले तरी ती आत्मवंचना ठरेल. त्यातून विरोधी पक्षीय एका स्वान्तसुखद कोशात गुरफटून जात असून त्यातून उलट सत्ताधारी पक्षाचेच फावते. म्हणून या 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांनी भाजपचे काय बरोबर नाही यावर भर देतानाच आपलेही काय आणि कोठे चुकते हे प्रामाणिकपणे मान्य करायला हवे आणि त्याच्या दुरुस्तीसाठी पावले उचलायला हवीत. तसे करायचे तर फुकाचा मोठेपणा आणि स्वतःविषयीचा दंभ सोडून द्यावयाची तयारी हवी. ती कशी करायची हे त्यांनी भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांकडून शिकावे. भाजप धुरीणांविषयी अत्यंत जहाल भाषेत टीका करणाऱ्या, धर्मांधतेचा आरोप करणाऱ्या नितीशकुमार आदींस जितक्या सहजपणे भाजपने गळामिठीत घेतले ते थक्क करणारे होते. सत्ता राखण्याची शक्यता अधिक असलेला भाजप आघाड्या बनवण्यात, विरोधकांस आपलेसे करण्यात जी चतुराई आणि गती दाखवतो त्याच्या निम्म्यानेही सत्ताकांक्षी 'इंडिया' आघाडी ही विरोधकांस एकत्र राखण्यात, जे आपलेच आहेत ते आपल्याकडे राहतील यासाठी प्रयत्न करताना दिसत नाही. भाजप आणि त्या पक्षाच्या समर्थकांनी कितीही दावे केले तरी निवडणुकोत्तर सत्तासमीकरणांत आघाड्यांस महत्त्व येण्याची शक्यताच अधिक. असे असताना सत्ता राखण्याची खात्री असलेल्या भाजपपेक्षा सत्ता मिळवण्याचे आव्हान असलेल्या 'इंडिया' आघाडीने अधिक राजकीय चापल्य दाखवणे गरजेचे. तेव्हा भारत जोडो अथवा न्याय यात्रा, इंडिया आघाडीची संयुक्त सभा इत्यादी कृत्ये आवश्यकच. ती झाली. आता प्रत्यक्ष जमिनीवर उतरून मतदारांपर्यंत पोहोचणे, आपण सत्ताधाऱ्यांस आव्हान देऊ शकतो असे चित्र निर्माण करणे अधिक महत्त्वाचे. सत्ताधाऱ्यांचे चुकते म्हणून आम्हा विरोधकांचे बरोबर हे राजकीय आव्हानांचे सुलभीकरण झाले. त्यावर विसंबून राहण्याचा काळ मागे पडला. आता आम्ही सत्तासमीकरणासाठी किती सक्षम आहोत हे विरोधकांनी मतदारांवर अधिकाधिक ठसवण्याची गरज अधिक. त्यासाठी पुढल्या अगदी थोड्या दिवसांत अपार कष्ट करण्यास पर्याय नाही. आगामी राजकीय लढाईचे तागडे हे विद्यामान सत्ताधीशांच्या बाजूने झुकल्यासारखे वाटत असले तरी ते तिकडे पूर्णपणे कललेले नाही. म्हणून विरोधकांसाठी अजूनही वेळ गेलेली नाही. त्यासाठी 'इंडिया' आघाडीस अशा मेळाव्यांतील छायाचित्रसंधीपलीकडे जाऊन अपार कष्ट करावे लागतील. 'आधी कष्ट, मग फळ / कष्टचि नाही ते निर्फळ' हे सत्य राजकारणासही लागू पडते.

नायगाव उड्डाणपूल बनलाय मद्यपींचा अड्डा

पोलिसांचा धाक उरला नसल्याचा नागरिकांचा आरोप

नालासोपारा : नायगाव पूर्व-पश्चिमेला जोडणारा उड्डाणपूल हा मद्यपींचा अड्डा बनला असून दारू प्यायल्यानंतर त्या बाटल्या रस्त्यावर आणि घरांवर फेकत असल्याने रहिवाशांचा जीव धोक्यात आला आहे. गुन्हेगारीला आळा बसावा यासाठी नायगाव पोलीस ठाण्याची निर्मिती केली असून, गुन्हेगारावर वचक ठेवण्यात अपयशी ठरले आहे. या मद्यपींना पोलिसांचा धाक उरला नाही का, असा सवाल नागरिक विचारत आहेत. अलीकडेच बांधण्यात आलेला नवीन पूल नागरिकांना फायद्यापेक्षा जास्त त्रास सहन करावा लागत आहे. या पुलावरून अनेकदा बाटल्या व इतर साहित्य, कचरा टाकण्यात येतो. रात्रीच्या सुमारास अज्ञातांकडून पुलावरून नारळ, हार-फुले व इतर अवजड सामानाने भरलेली गोणी अंधारात फेकून दिली. मिटनापाडा येथील रहिवासी मनोज पटेल यांच्या घरावर ही गोणी पडली. यात घरावरील पत्रे फुटले, मात्र त्यावेळी घरातील सदस्य बाहेर गेले असल्यामुळे दुखापत झाली नाही. उपाययोजना करा, अन्यथा आंदोलनाचा इशारा दळणवळणाच्या दृष्टिकोनातून नायगाव पूर्व-पश्चिम उड्डाणपूल बांधण्यात आला आहे. हा पूल रहिवाशांना त्रासदायक ठरला आहे. पुलाच्या खालच्या बाजूस राहणाऱ्या नागरिकांच्या घराचे पत्रे फुटून नुकसान झालेले आहे. दिवसेंदिवस अशा घटना सतत घडत असल्याने येथील रहिवाशांत भीतीचे वातावरण पसरले आहे. काही वाहनधारक या पुलावरून जाताना बेजबाबदारपणे वस्तू फेकत असतात. यामुळे या भागात एखादा अपघात घडून जीवितहानी झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल समाजसेविका अभिलाषा वर्तक यांनी केला आहे. एमएमआरडीएने पुलावर आवश्यक उपाययोजना करून गैरप्रकारांना निर्बंध घालण्यासाठी सीसीटीव्ही लावण्यात यावे, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

रेल्वे फाटक बंद झाल्यास पर्यायी मार्गाची मागणी

पालघर : सफाळे पूर्व-पश्चिम भागाला जोडण्यासाठी नव्याने सुरू होत असलेला रेल्वे उड्डाणपूल अखेरीस पूर्ण होत असल्याने रेल्वे फाटक बंद होणार आहे. रेल्वे फाटक बंद होत असताना कोणताही पर्यायी अथवा मार्ग रेल्वे प्रशासनाने दिला नाही. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांचे व नागरिकांचे हाल होणार असल्याने पक्ष व संघटनांतर्फे नव्याने संघर्ष समितीची स्थापना करीत आक्रमक भूमिका घेतली आहे. सफाळे हे मध्यवर्ती ठिकाण असून, मोठी बाजारपेठ आहे. बाजारपेठेला जवळपास ५० गावे रेल्वे स्टेशनशी जोडली गेलेली आहेत. रेल्वे फाटक बंद झाल्याने या गावातील सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, शेतकरी, मच्छीमार व आदिवासी बांधवांना प्रचंड त्रास सहन करायला लागणार असल्याचे समितीची स्थापन झाल्यानंतर राजेश म्हात्रे यांनी सांगितले.

आचारसंहितेमुळे शहर विद्रुपीकरणाला लागला 'ब्रेक'

एका दिवसात ३ हजार ५६५ बॅनर,पोस्टर्सवर पालिकेची कारवाई

विधानसभा क्षेत्रानुसार कारवाई

- कळवा-मुंब्रा - १४०४
- कोपरी-पाचपखाडी - ८८३,
- ठाणे विधानसभा - ६७४,
- ओवळा-माजिवाडा -२४४
- कल्याण ग्रामीण दिवा - ३६०

ठाणे : लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता शनिवारी पासून लागू झाली . त्यानुसार आता ठाणे महापालिकेच्या माध्यमातून नऊ प्रभाग समिती अंतर्गत सहाय्यक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय पक्षाचे बॅनर झेंडे यावर ही कारवाई सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार एका दिवसात ३हजार ५६५ बॅनर, पोस्टर उतरविण्यात आले आहेत. ठाणे शहरातील मुख्यरस्त्यांवरील विद्युत खांबांवरही विविध राजकीय पक्षाकडून फलक लावले जातात. अशा प्रकारचे बॅनर लावण्यामध्ये राजकीय पक्षांचे नेते आघाडीवर असल्याचे दिसून येते. अशा प्रकारांना आळा बसावा यासाठी महापालिकेने शहरातील काही ठिकाणे निश्चित करून त्याठिकाणी बॅनर लावण्यासाठी परवानगी घेण्याची योजना सुरू केली होती. यानंतरही शहरात बेकायदा बॅनर लावण्याचे प्रकार सुरुच होते. दरम्यान, लोकसभा निवडणूकीसाठी आचारसंहिता जाहीर होताच ठाणे महापालिकेने प्रभाग समितीनिहाय पथके नेमून बेकायदा बॅनर काढण्याची कारवाई सुरू केली आहे. सहाय्यक आयुक्त आणि त्यांच्या पथकामार्फत ही कारवाई केली जात आहे. नऊ प्रभाग समिती अंतर्गत ही कारवाई सुरु आहे.शनिवारपासून सुरू झालेल्या कारवाईमध्ये आतापर्यंत ३ हजार ५६५ इतके राजकीय पक्षांचे बॅनर हटविण्यात आले आहेत.लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने ठाण्याच्या विविध भागात राजकीय बॅनर मोठया प्रमाणात झळकले होते. यात शासन आपल्या दारी, नमो महारोजगार मेळावा, विविध स्वरुपाची भुमीपुजने, लोकार्पणे, आपल्या आवडता नेता ठाण्यात येणार म्हणून लावण्यात आलेले स्वागताचे बॅनर यामुळे ठाणे शहर हे विद्रुप झाले होते. किंबहुना ठाणे शहर हे या बॅनरबाजीमुळे भकास दिसत होते.

Rohit Sharma joins Mumbai Indians ahead of the tournament

Mumbai : Former Mumbai Indians skipper Rohit Sharma has joined the team's pre-season camp. The Indian skipper took to Instagram to share photos of him donning the Mumbai Indians jersey ahead of the IPL 2024. Taking to Instagram: A few months back, Rohit Sharma being replaced with Hardik Pandya as MI captain was the talk of the town. Rohit has led the franchise to five winning years. Pandya who captained Gujarat Titans in the previous two editions of the cash-rich league was bought by the Mumbai-based franchise for Rs. 15 crores ahead of the IPL 2024. Under the leadership of Hardik Pandya, Gujarat Titans won their maiden IPL title in their debut season which was in the year 2022. In 2023, under Pandya's captaincy, the team again made it to the finals but fell short against Chennai Super Kings. Dhoni-led CSK extended their trophy streak to five. Shubman Gill has been named as the new captain of Gujarat Titans. Rohit Sharma recently, won the five-match test series against England by 4-1. Despite the absence of star players like Virat Kohli and KL Rahul, the youngsters led the charge of the Indian batting lineup. After clinching the series, Rohit was seen at the Wankhede Stadium attending the Ranji Trophy final clash between Mumbai and Vidarbha. The hosts won their 42nd Ranji Trophy title. Ajinkya Rahane-led Mumbaikars defeated Vidarbha by 169 runs. Coming to the IPL 2024, the season opener will be played between Royal Challengers Banglore and defending champions Chennai Super Kings on March 22 at the MA Chidambaram Stadium. MI will play their first clash of the IPL 2024 against Gujarat Titans on March 24 at the Narendra Modi Stadium. The match has gained a lot of attention due to Hardik Pandya's return to the former team.

Mumbai suburban district has 72.28 lakh voters, says Collector

Mumbai,

Mumbai suburban district has more than 72 lakh eligible voters and over 4,600 of them are 100 years or above in age, and it has added nearly four lakh electors after the last Lok Sabha polls in 2019, an official said on Monday, reported news agency PTI. Collector and district election officer Rajendra Kshirsagar, addressing a press conference in Bandra, said Mumbai suburban, which will vote on May 20 in the fifth phase of Lok Sabha elections 2024, has 72,28,403 eligible lakh, about 4 lakh more compared to the 2019 elections, reported PTI.

Separate teams will be formed to look after voters with disability. The Election Commission has decided to provide ballot paper facility at home for PwD voters and those above the age of 85, according to Kshirsagar."For those above 85 years of age and for certified handicapped voters, the Election Commission has provided this (ballot paper) facility," he said, adding since last month they have been reaching out to such electors and making them aware of this option available to them, reported PTI.Whether or not to avail this option will be the sole discretion of such voters, the collector clarified, adding super seniors coming out to exercise their franchise will inspire others.Kshirsagar said all polling stations in the suburban district will be disabled-friendly and wheelchairs will be provided to elderly and voters with special needs.Mumbai suburban district has four Lok Sabha constituencies and 26 assembly seats.

Kshirsagar said registration of voters in the 18 to 19 age group in the district was just 0.5 per cent as compared to the national average of 3 per cent, reported PTI.Last month, officials conducted a special drive to register more voters in the age groups of 19 to 20 and 20 to 21 years, said the collector.Kshirsagar said he has sent around 4,000 letters with his signature to Bollywood celebrities and prominent figures in the entertainment industry staying in Mumbai suburban district and appealed to them to spread awareness about voting, reported PTI.

According to the collector, veteran actor Jitendra has already responded and appealed to voters to exercise their franchise in large numbers, while they have approached superstar Amir Khan and singer Kailash Kher to issue a similar appeal, reported PTI.

He said the district will have 7,363 polling stations at 1,083 locations, apart from 27 auxiliary booths. Auxiliary polling booths are created where there are more than 1,500 voters.

मुब्र्यांत मीटर बॉक्स जळून खाक

■ **मुंब्रा**: कौसा येथील जामा मस्जिद समोरील रेड रोज सोसायटी या सात मजली इमारतीच्या तळ मजल्यावरील मीटर रूममध्ये मध्यरात्री आग लागली. ही आग अग्निशमन दलाच्या जवानांकडून अडीच वाजण्याच्या सुमारास पूर्णपणे विझवण्यात आली. घटनास्थळी टोरंट पॉवर कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान तसेच मुंब्रा स्थानकाचे पोलीस कर्मचारी उपस्थित होते.या घटनेत सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही.

एटीएमची तोडफोड

■ **भिवंडी**: भिवंडी शहरातील वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या तहसीलदार कार्यालय समोरील कोणार्क आर्केट या इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या एटीएम च्या कॅश बॉक्सची तोडफोड करून चोरटयांनी ३२०० रुपयांची चोरी केल्याची खळबळजनक घटना उघड झाली आहे.याबाबत पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. भिवंडी महापालिका मुख्यालय शेजारी व मुख्य शासकीय कन्यल्या असलेल्या परिसरात कोणार्क आर्केट ही इमारत असून तळमजल्यावर बँक ऑफ बडोदा शाखेच्या बाजूच्या गाळ्यामध्ये बेसीन कॅथोलीक कॉ. ऑप. बँक लिमिटेड या बँकेचे एटीएम आहे.

महापालिकेतर्फे मतदार जनजागृती

■ **ठाणे** : ठाणे महानगरपालिक च्यावतीने रविवार, २४ मार्च रोजी मतदार जनजागृती अभियानांतर्गत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या सायकल रॅलीचे दोन टप्पे असतील. एक रॅली ठाणे-पवई-ठाणे अशी आहे. तर दुसरी रॅली ठाणे- नितीन जंक्शन ते मीठबंदर रोड, ठाणे खाडीजवळ, ठाणे (पूर्व) अशी आहे. या दोन्ही रॅलीसाठी नाव नोंदणी सुरू आहे. या रॅलीतील सहभाग विनामूल्य आहे. जास्तीत जास्त सायकल प्रेमींनी या रॅलीत सहभागी होऊन मतदार जागृतीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी केले आहे.

तृतीय पंथीयांची दुकानदाराला मारहाण

■ **भिवंडी**: दोन तृतीय पंथीयांनी एका केक दुकानदाराकडे शंभर रुपयांची मागणी केली असता त्यांना दुकानदाराने नकार दर्शवल्याच्या रागातून तृतीय पंथीयांनी त्यास शिवीगाळ करत मारहाण केल्याची संतापजनक घटना भिवंडीतून समोर आली आहे.याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळू व सोन्या अशी गुन्हा दाखल झालेल्या तृतीय पंथीयांची नावे आहेत. १७ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता कामतघर परिसरातील भाग्यनगर मधील गणेश मंदिरा जवळ राहणारे ज्ञानप्रकाश विनय सिंह हे त्यांच्या मालकीच्या केक गार्डन या केक दुकानात काम करत होते.त्यावेळी दोघे आरोपी त्या ठिकाणी येवून त्यांनी ज्ञानप्रकाश यांच्याकडे १०० रुपयांची मागणी केली.परंतु त्यांनी त्यास स्पष्ट नकार दिला.त्यामुळे या रागातून तृतीय पंथीयांनी आपसात संगनमताने ज्ञानप्रकाशला शिवीगाळ केली.त्यानंतर बाळूने दुकानात जबरीने शिरून ज्ञानप्रकाशचे डोक भिंतीवर आपटून त्यास जखमी केले आहे.

बेपत्ता भावंडांचा पाण्याच्या टाकीत पडून अंत

■ **मुंबई** : घराजवळ खेळताना अचानक बेपत्ता झालेल्या अवघ्या चार आणि पाच वर्षांच्या दोन सख्ख्या भावांचा महानगरपालिकेच्या पाण्याच्या टाकीत पडून दुर्दैवी अंत झाल्याची घटना वडाळ्यात घडली. भावंडांच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून मुंबई महानगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे या मुलांचा मृत्यू झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. याप्रकरणी अपमृत्यूची नोंद करून रफी अहमद किडवाई मार्ग पोलीस अधिक तपास करीत आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अंकुश मनोज वाघरी (५ वर्षे ४ महिने) आणि अर्जुन मनोज वाघरी (४ वर्षे ३ महिने) अशी मृत भांवाची नावे आहेत. दोन्ही मुलांचे वडील मनोज हे पत्नी आणि अन्य तीन मुलांसह येथील सुभाष नगरमध्ये राहतात. ते कपड्यांवर भांडी, प्लास्टिक वस्तू विकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात.

नेहमी प्रमाणे रविवारी सकाळी घराजवळ असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या 'वन गार्डन'च्या भिंतीच्या कडेला अंकुश आणि अर्जुन खेळत होते. बराच वेळ झाला तरी दोघेही घरी न परतल्याने मनोज यांच्या पत्नीने त्यांचा शोध घेतला. मात्र, दोन्ही मुले न सापडल्याने तिने मनोज यांना बोलावून घेतले.

वन गार्डन हे मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असून येथे जमिनीमध्ये खूप जुनी पाण्याची टाकी आहे. या टाकीची झाकणे उघडी असून त्याच्यावर काळ्या रंगाचे प्लास्टिक टाकण्यात आले होते. पाण्याच्या टाकीवर झाकण नसल्यामुळे ही दुर्घटना घडली असून याला मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी जबाबदार असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

मनोज यांनी संपूर्ण वडाळा परिसर शोधला; पण मुले सापडली नाहीत. अखेर त्यांनी माटुंगा पोलीस ठाण्यात धाव घेत मुले बेपत्ता झाल्याची तक्रार दिली. माटुंगा पोलिसांनी याप्रकरणी अपहरणाचा गुन्हा दाखल करून मुलांचा शोध सुरू केला. पोलीस आणि कुटुंबीयांकडून मुलांचा शोध सुरू असतानाच वन गार्डन येथे असलेल्या पालिकेच्या उघड्या पाण्याच्या टाकीत या दोन्ही मुलांचे मृतदेह रफी अहमद किडवाई मार्ग पोलिसांना सोमवारी सकाळी सापडले. पोलिसांनी दोन्ही मुलांच्या मृतदेहाची ओळख पटवून मृतदेह शवविच्छेदनासाठी केईएम रुग्णालयात पाठवून तपास सुरू केला. पोलिसांनी घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही तपासले असता दोन्ही मुले एका मुलाच्या मागे वन गार्डनमध्ये जाताना दिसत आहेत. तसेच येथील एका सोसायटीच्या सीसीटीव्हीमध्ये ही मुले पाण्याच्या टाकीकडे खेळताना दिसत आहेत. दोन मुलांपैकी एक जण पाण्याच्या टाकीतून बाटलीत पाणी भरण्याचा प्रयत्न करत असताना टाकीत पडला. त्याच्या पाठोपाठ दुसरा मुलगासुद्धा पाण्याच्या टाकीत पडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. तरी, या प्रकरणी अधिक तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

रसायनी हत्याकांडातील दोन आरोपींना अटक

■ **रसायनी** : रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चावणे गाव ते पेट्रोनॉस कंपनीकडे जाणाऱ्या रोडने एका नाल्यामध्ये एक इसमाचा धारदार शस्त्राने खून करून मृतदेह फेकून दिल्याचे आढळून आले. याप्रकरणी रसायनी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. या गुन्ह्याचा तपास रसायनी पोलीस ठाणे तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड यांनी सुरू केला. पोलिसांनी मृताची ओळख पटवली असून मृताचे नाव जयेश काशिनाथ खुडे असे आहे. यातील आरोपींचा शोध सुरू होता. मात्र त्यात पोलिसांना यश मिळत नव्हते. त्यामुळे या गुन्ह्याची असमरी न्यायालयात सादर करण्यात आली. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांना रायगड जिल्ह्यातील उघडकीस न आलेले खुनाचे गंभीर गुन्हे उघड करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी जिल्ह्यातील उघड न झालेल्या खुनाच्या गुन्ह्याचा पुन्हा तपास सुरू केला. त्यापैकी हा खुनाचा गुन्हा उघड करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि संदीप पोमण व पथकाला सूचना दिल्या. त्याप्रमाणे सपोनि पोमण व पथकातील अंमलदार स.फौ. राजेश पाटील, स.फौ. प्रसाद पाटील, पो.ह. यशवंत झेमसे, पो.ह. संदीप पाटील, पो.ह. राकेश म्हात्रे, पो.ह. सुधीर मोरे यांनी आपले कौशल्य पणाला लावून या गुन्ह्यातील आरोपी ओमकार सुनील शिंदे (२५, रा. समर्थकृपा सदन, वावंढळ, ता. खालापूर) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता हा गुन्हा त्याने त्याच्या साथीदार आरोपी रोहित विष्णू पाटील (रा. चांभार्ली) याच्या मदतीने केल्याची कबुली दिली. या गुन्ह्यातील आरोपी रोहित यास जामखेड, जि. अहमदनगर येथून ताब्यात घेण्यात आले. या खुनाला ६ वर्षे होऊनही कुठल्याही प्रकारचा पुरावा नसताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आपले कौशल्य पणाला लावून पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, सपोनि संदीप पोमण व पथकाने गुन्हा उघडकीस आणला.

अल्पवयीन मुलींना अश्लील व्हिडीओ दाखवणारा सुरक्षा रक्षक गजाआड

■ **मुंबई** : इमारतीमधील मोकळ्या जागेत खेळत असलेल्या मुलींना मोबाईलमध्ये अश्लील व्हिडीओ दाखवणाऱ्या सुरक्षा रक्षकाला वांद्रे पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. सलमान मोहम्मद अली शेख (३५) असे आरोपीचे नाव आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आरोपी शेख हा २०२२ मध्ये जुहू पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपी असून पोलीस त्याच्याकडे कसून चौकशी करीत आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यातील फिर्यादी यांची नऊ वर्षांची मुलगी रविवारी सकाळी तिच्या वयाच्या ५ ते ६ मैत्रिणींसोबत इमारतीच्या मोकळ्या जागेत खेळत होती.

यावेळी आरोपी सलमान याने तेथे जात मुलींना जवळ बोलवून घेतले. त्यानंतर त्याने मोबाईलमधील अश्लील व्हिडीओ मुलींना दाखवले. तर, यातील सहा वर्षांच्या मुलीला अश्लील व्हिडीओ दाखवण्यासाठी दुसऱ्या मजल्यावर नेले. मुलीने हा प्रकार वडिलांना सांगितला. त्यानंतर त्यांनी ही माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपी सलमान याला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले.

पोलिसांनी पीडित मुलीच्या वडिलांची फिर्याद नोंदवून घेत याप्रकरणी भादंवि कलम ३५४ (ए) आणि पॉक्सो कायद्याच्या कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करून आरोपी सलमान याला अटक केली आहे. अंधेरी पूर्वेकडील एमआयडीसी रोड नं. १९ परिसरात राहत असलेल्या आरोपी सलमान विरोधात २०२२ मध्ये बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

ठाण्यातील अमली पदार्थांचे धागेदोरे उत्तर प्रदेशपर्यंत!

पोलिसांनी वेशांतर करत दीड महिन्यात लावला फॅक्टरीचा शोध

■ **ठाणे** : ठाणे गुन्हे शाखा युनिट-१ च्या पथकाने अमली पदार्थ मेफेड्रोन विक्रीप्रकरणी २४ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत चार जणांना अटक करून त्यांच्याकडून १४ लाख ५ हजार रुपयांचे ४८१ ग्रॅम मेफेड्रोन हस्तगत केले. आरोपींच्या अधिक चौकशीत मिळालेल्या या अमली पदार्थांमागचे धागेदोरे उत्तर प्रदेशपर्यंत पसरलेले आढळून आले. त्या मूळ कारखान्याचा शोध लावण्यासाठी पोलिसांनी तब्बल दीड महिना वेषांतर करून कारवाई यशस्वी केली. उत्तर प्रदेश आणि ठाणे पोलिसांनी मिळून केलेल्या या कारवाईत एकूण २७ कोटी ८७ लाख १७ हजार ९०२ रुपयांचा एमडी (मेफेड्रोन)चा साठा हस्तगत केला आहे. यूपीच्या वाराणसी येथील भगवतीपूर गावात असलेल्या फॅक्टरीत सहा आरोपींना बेड्या पडल्या आहेत.

ठाणे कासारवडवली पोलीस ठाण्यात अमली पदार्थविरोधी कायद्यानुसार दाखल गुन्ह्यात अटक केलेल्या आफताब अजीज मलाडा (२२), जयनाथ चंद्रबली यादव ऊर्फ कांचा (२७), शेरबहादूर राधेश्याम सिंग ऊर्फ अंकित (२३) आणि हुसेन सलीम सय्यद (४८) यांच्याकडून एमडी साठा हस्तगत करण्यात आला होता. त्यांच्या चौकशीत पोलीस पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारे मेफेड्रोन उत्पादन करणारी फॅक्टरी वाराणसी येथील भगवतीपूर गावात असल्याची माहिती मिळाली होती. ही फॅक्टरी शोधण्यासाठी ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस दीड महिना वेषांतर करून तिथे कार्यरत होते. यात स.पो.नि. रुपाली पोळ, पो. शि. विजय यादव यांचा सहभाग होता. त्या कारखान्याचा शोध लागल्यानंतर त्यांनी उत्तर प्रदेश पोलिसांच्या मदतीने मेफेड्रोन उत्पादन करणाऱ्या कारखान्यावर छापेमारी केली. यावेळी अलकुमार सिंह व संतोष हडबडी गुप्ता यांना अटक करण्यात आली. कारखान्यात पोलीस पथकाला २ कोटी ६४ लाख ५० हजार रुपये किमतीची एम. डी. (फेड्रोन) फिस्टल पावडर सापडली. कारखान्याजवळ सापडलेल्या मोटारीतून मेफेड्रोन बनवण्यासाठीचा २५ कोटींचा कच्चा माल हस्तगत केला.

अमेरिकेत मुलाकडून अपघात झाल्याचे सांगत वृद्ध व्यावसायिकासह महिला वकिलाची फसवणूक

■ **मुंबई** : अमेरिकेत नोकरीला असलेल्या मुलाने अपघात केला असून तो कोठडीत असल्याची भीती घालून सायबर ठगांनी मालाडमधील एका वृद्ध व्यावसायिकासह महिला वकिलाला ऑनलाइन गंडा घातल्याची घटना शनिवारी घडली. याप्रकरणी अज्ञात मोबाईलधारकाविरोधात गुन्हा दाखल करून मालाड पोलीस अधिक तपास करीत आहेत.

मालाड पश्चिमेकडील आदर्श दुग्धालय लेन परिसरात ६४ वर्षीय व्यावसायिक दुश्यांत हे कुटुंबासोबत राहतात. त्यांचा २६ वर्षीय मुलगा अमेरिकेत नोकरीला आहे. हाच धागा पकडून ठगाने १६ मार्चच्या रात्री दुश्यांत यांना व्हॉट्सॲप कॉल केला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने इन्सपेक्टर विनोद शर्मा बोलत असल्याचे सांगत तुमच्या मुलाने अमेरिकेत अपघात केला आहे. तो सध्या कोठडीमध्ये असून जामीन करण्यासाठी एक लाख रुपये तत्काळ 'गुगल पे'वर पाठवा, असे सांगितले.

कॉलवरील बोलणे ऐकून दुश्यांत घाबरले. त्यांच्याकडे गुगल पे ॲप नसल्याने त्यांनी लगेचच शेजारी राहणाऱ्या महिला वकिलाला बोलावून घेत त्यांना गुगल पेने पैसे पाठवण्याची विनंती केली. महिला वकिलानेही मागचा पुढचा विचार न करता कथित इन्सपेक्टर विनोद शर्मा याने दिलेल्या गुगल पे नंबरवर ५० हजार रुपये पाठवले. गुगल पेवरून पैसे पाठवण्याची मर्यादा संपली असल्याचे महिला वकिलाने सांगितल्यावर कथित इन्सपेक्टर विनोद शर्मा याने त्यांना उर्वरित रक्कम इंटरनेट बँकिंगद्वारे नोएडा येथील एका खात्यावर पाठवण्यास सांगितली. महिला वकील पैसे पाठवणार तेवढ्यात दुश्यांत यांना त्यांच्या मुलाचा कॉल आला. त्याने आपला कोणत्याही प्रकारचा अपघात झाला नसून तो सुखरूप असल्याचे सांगितले. कथित इन्सपेक्टर विनोद शर्मा हा खोटे बोलत असून त्याने आपली फसवणूक केल्याची दुश्यांत आणि महिला वकिलाची खात्री पटली. मात्र, तोपर्यंत या दोघांनी ५० हजार रुपये गमावले होते. अखेर, महिला वकिलाने मालाड पोलीस ठाणे गाठून विनोद शर्मा नावाच्या सायबर ठगाविरोधात तक्रार दिली आहे.

रोजगारवाढीच्या चालनासाठी प्रशिक्षण

■ **जव्हार** : गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वारली पेंटिंग आणि टॅली एडिट लॉग कोर्स घेण्यात आले होते. यात अनुक्रमे ३० आणि ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कोर्सचे प्रमाणपत्र शुक्रवारी विशेष कार्यक्रमाच्या नियोजनातून महाविद्यालयात वितरीत करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एम. आर. मेश्राम, सेवानिवृत्त उपप्राचार्य डॉ. एच. बी. मुकणे, समन्वयक गणेश कनगरे, माजी विद्यार्थी मंडळाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. संगणक प्रशिक्षणामधील टॅली हा कोर्स अतिशय उपयुक्त आहे.

पत्नीला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या पतीला अटक

■ **भिवंडी** : प्रेमविवाह झालेल्या विवाहितेने पतीच्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना भिवंडीतून समोर आली आहे.याप्रकरणी पीडितेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी विवाहितेच्या बहिणीच्या फिर्यादीवरून पतीच्या विरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यास बेड्या ठोकल्या आहेत.

गजाला अन्सारी (२०) असे पीडित मृत विवाहितेचे नाव आहे.तर जुनेद मोहम्मद हारून अन्सारी असे अटक केलेल्या पतीचे नाव आहे. मृत गजाला ही तिच्या परिवारासह शहरातील गायत्रीनगर येथील रामनगरमधील राम मंदिराजवळ राहते.दरम्यान तिचा दीड वर्षांपूर्वी जुनेद याच्याशी प्रेमविवाह झाला होता.त्यानंतर ती सासरच्यांसोबत भिवंडीतील फातमानगरमध्ये राहत होती.तर मृत गजालाची मोठी बहीण कौसर परविन कसीबुल शेख हिने दिलेल्या फिर्यादीनुसार,१७ मार्च रोजी गजालाने जुनेदकडे खर्चासाठी पैशांच्या मागणीसह तो घरी उशिरा येत असल्याने त्याला जाब विचारला होता.त्यावरून दोघांमध्ये वाद होऊन जुनेदने पीडितेला शिवीगाळ करून मारहाण केली होती. तसेच जुनेद गजालाला क्षुल्लक कारणावरून मारहाण करून मानसिक व शारीरिक त्रास देत असल्याचे कौसरने तिच्या तक्रारीत म्हटले आहे.त्यामुळे पतीच्या या जाचाला कंटाळून अखेर गजालाने तिच्या सासरी राहत्या घरात १७ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास गळफास लावून स्वतःची जीवनयात्रा संपवल्याचा आरोप कौसरने जुनेदवर केला आहे.पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह शवविच्छेदनाकरता पाठवला आहे.तर या आत्महत्येप्रकरणी शांतीनगर पोलिसांनी तपासाअंती तूर्तास कौसरच्या फिर्यादीवरून जुनेदच्या विरोधात गुन्हा नोंदवून त्यास अटक केली आहे.त्यास सोमवारी न्यायालयात हजर केले असता २० मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

यंदाच्या होळीला रंग उधळणार चार्जिंगच्या पिचकाऱ्या!

ठाण्यातील 'रंगपंचमी 'साठी सजल्या अनेक बाजारपेठा

■ **ठाणे** : रंगपंचमीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे ठाणे शहरातील बाजारपेठांमध्ये दुकाने पर्यावरणपूरक रंग , आकर्षक पिचकाऱ्या , स्प्रे रंग , रंगबेरंगी फुग्यांची स्ट्रिप्स , चमकी रंग यांसारख्या विविध गोष्टींनी सजली आहेत . पिचकारीमध्ये विविध प्रकार विक्रीस उपलब्ध झाले असले तरी यंदा बॅटरीवर चालणारी चार्जिंग पिचकारी आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. ही पिचकारी सेलवरही चालत असून त्यातून शॉट , मिडीयम, लॉन्ग रेंज मध्ये पाणी उडवता येत असल्याची माहिती पिचकारी विक्रेत्याने दिली. त्याचबरोबरीने विविध रंग, गुलाल, विविध आकार आणि प्रकाराच्या पिचकारी घेण्यासाठी दिवसागणिक गर्दी वाढू लागते. यंदा पारंपरिक कच्चे रंग, हर्बल रंग, चमकी रंग, कॅप्सूल रंग, चार बूँद वाला, ट्यूबरंग असे विविध रूपात रंग विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. तसेच स्नो स्प्रेमध्ये पण विविध रंग यंदा उपलब्ध झाले आहेत. पिचकारी मध्ये देखील लहान, मध्यम, मोठ्या पिचकारी सह विविध आकर्षक रूपातील पिचकारी दाखल झाल्या आहेत.त्यात यंदा बॅटरी वर चालणारी पिचकारी नव्याने आली आहे. त्यामुळे तिला चांगलीच पसंती मिळत आहे. ती साधारण पणे ५०० ते ६०० रुपयांना मिळत आहे. तर वॉटर गन, पिचकारी - लहान, मोठी, पिस्तुल, कार्टून बॅग, पंप पिचकारी, बॅग पिचकारी, कार्टून कॅरेक्टरची पिचकारी, धनुष्यबाण रूपातील पिचकारी, एके - ४७ पिचकारी, शॉर्ट - लॉन्ग डिस्टन्स पिचकारी अशा एक ना अनेक प्रकारच्या पिचकारी लक्ष वेधून घेत आहेत. यावर्षी पिचकारी सह रंगांच्या किंमती मध्ये १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली असल्याची माहिती विक्रेत्यांनी दैनिक पुण्यनगरीशी बोलताना दिली .

◆ विविध आकारांवर आणि त्यांच्या प्रकारांवर पिचकारीच्या किंमती आहेत.अग्निशामक उपकरणाप्रमाणे रंगांचे देखील ४ किलो , ६ किलोच्या रूपात रंगांची उधळण करणारे सिलेंडर देखील विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत.

◆ तर कार्टून कॅरेक्टर पिचकारी मध्ये मिकी माउस , स्पायडर मॅन , छोटा भीम , मोटू पटलू , अँग्री बर्ड्स सारखे विविध कॅरेक्टरच्या पिचकारी लहानमुलांच्या पसंतीस पडत आहेत .

छुप्या पद्धतीने प्लास्टिक पिशव्यांची विक्री

■ पाण्याच्या, रंगांच्या पिशव्या फेकून मारल्याने होणाऱ्या अपघातांमुळे होळी – रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर प्लॅस्टिकच्या पिशव्या वापरण्यास मज्जाव करण्यात येत आहे तरीही छुप्या पद्धतीने प्लॉस्टिक पिशव्यांची विक्री बाजारात सुरू आहे . ४० रुपयांना १०० – १५० पिशव्या पाकिटात मिळत असल्याचा दावा विक्रेते करत आहेत. पाण्याचे फुगे देखील दुकानामध्ये विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे .

विनापरवानगी होर्डिंग्ज लावल्यास आचारसंहिताभंगाचा गुन्हा

■ **कल्याण** : सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्या अनुषंगाने कल्याण - डोंबिवली महापालिका क्षेत्रात विनापरवानगी होर्डिंग लावल्यास आचासंहिताभंगाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा मालमत्ता विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे यांनी दिला आहे. कल्याण - डोंबिवली महापालिका क्षेत्रात मालमत्ता विभागामार्फत खासगी आणि पालिकेच्या जागेवर ठेक्याने उभारलेल्या होर्डिंगवर निवडणूकीच्या कालावधीत राजकीय अथवा इतर जाहिरात प्रसिद्ध करायची असल्यास संबधित होर्डींजधारकांनी पालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. ज्या होर्डिंगधारकांची जाहिरात फी थकित असेल त्यांनी त्वरित जाहिरात फी चा भरणा करून त्यानंतरच राजकीय अथवा इतर जाहिराती प्रसिद्ध कराव्यात असे मालमत्ता विभागतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र ज्या होर्डिंग्जधारकांना परवानगी नसेल त्यांनी पाचपट फी भरून जाहिरातीचे रितसर नियमीतीकरण करूनच जाहिरात प्रसिध्द करावी. अन्यथा आचासंहितेचा भंग समजून होर्डिंग्जमालकांवर गुन्हा दाखल करण्यात येईल तसेच होर्डिंग जप्त करण्याची कारवाई देखील मालमत्ता विभागातर्फे करण्यात येईल असे उपायुक्त वंदना गुळवे यांनी सांगीतले आहे.

पीककर्जाच्या परतफेडीची शेतकऱ्यांना चिंता

■ **वाडा** : तालुक्यात मोठ्या प्रमाणात धानाचे उत्पादन घेतले जाते. धान उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी २० हजार रुपये बोनस घोषित केला. परंतु अद्याप शेतकऱ्यांच्या बचत खात्यात बोनसची रक्कम जमा करण्यात आली नाही. त्यातच शेतकऱ्यांना पीक विमासुद्धा मिळाला नाही. याच महिन्यामध्ये घेतलेले कृषी कर्ज भरायचे आहे. मात्र शेतकऱ्याजवळ पैसेच नसल्याने पीक कर्ज कसे भरायचे, असा प्रश्न सध्या शेतकऱ्यांना पडला आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांनी धान पीक घेतले. परंतु ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. उत्पादनात घट झाली. शेतकऱ्यांच्या शेतात कडपा(धान)ला कोंब फुटले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने दान विकावे लागले. मागील वर्षी शेतकऱ्यांना बोनस मिळाले होते. यावर्षी शेतकऱ्यांना बोनस प्राप्त होण्याची अपेक्षा आहे. अद्याप बोनस शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले नाही.

भूमिपुत्र संघटनेचे बेमुदत उपोषण सुरू

■ **वाडा** : शहरातील वाढीव गौण खनिज उत्खननाबाबत व प्रत्यक्ष खोदकाम व साठ्यामधील असलेल्या तफावतीचा वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करूनसुद्धा प्रशासनाकडून संबंधितांवर कुठल्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने सोमवारपासून भूमिपुत्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर दळवी यांनी तहसीलदार कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. नगर पंचायत हद्दीतील न.भू.क्र. ९१९ व ९२५ ते ९२८ या जमिनी क्षेत्रातील माती व दगडाचे विनापरवानगी खोदकाम, उत्खनन करून त्यांची बेकायदा वाहतूक करून गौण खनिजसाठा देसई येथील स.नं. ४६/५ क्षेत्र ०.२०.०० येथे साठा करून अन्यत्र हलवून शासनाचा लाखो, करोडो रुपयांचा महसूल बुडवला असल्याचे उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे. याप्रकरणी वारंवार अर्ज-विनंत्या करून संबंधितांवर कुठल्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने भूमिपुत्र संघटनेतर्फे तहसीलदार कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

> “ २१ तारखेला सुनावणी लावण्यात आली आहे. दोन्ही बाजूंच्या लोकांना बोलविण्यात आले असून, त्यांची बाजू ऐकून घेऊन मंडळ अधिकाऱ्यांच्या रिपोर्टची पडताळणी करून तहसीलदार योग्य निर्णय घेतील.
>
> – सुनील लहांगे, नायब